अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक १७९ I रविवार १२ एप्रिल २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 I www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'
भाग २५

## मानवातील सुप्त ईश्वरी शक्तीचा आविष्कार

सहजयोग ही काही नवीन संकल्पना नसून ती अनंतकाळापासून सृष्टीत अस्तित्वात आहे. सृष्टीतील प्रत्येक नैसर्गिक कार्य हे सहजयोगाचाच एक भाग आहे. 'सहज' या शब्दाचा अर्थ अत्यंत सखोल आहे; 'सह' म्हणजे तुमच्या सोबत आणि 'ज' म्हणजे जन्मलेले. म्हणजेच, ही ती शक्ती आहे जी तुमच्या जन्मापासून तुमच्यात वास करते. ही शक्ती सदैव आपल्यात स्थित असून ती निरंतर कार्यान्वित असते. या आंतरिक शक्तीद्वारे स्वतःचा संबंध थेट परमात्म्याशी जोडणे, यालाच खऱ्या अर्थाने 'सहजयोग' म्हटले जाते. मानवी शरीरात ही शक्ती अदृश्य स्वरूपात कार्यरत असते. वैद्यकीय शास्त्रात डॉक्टर जिला 'ऑटोनॉमस नर्व्हस सिस्टम' (Autonomous Nervous System) किंवा स्वयंचलित चेतासंस्था म्हणतात, ती हीच शक्ती होय. जरी विज्ञान याला 'स्वयंचलित' म्हणत असले, तरी ते 'स्वयं' नेमकं कोण आहे, हे विज्ञानाला अद्याप उलगडलेले नाही. हे 'स्वयं' म्हणजेच आपल्या अंतरातील ईश्वरी तत्व, ज्याला आपण 'आत्मा' म्हणून ओळखतो. जेव्हा मनुष्य स्वतःच्या या आत्मतत्वाशी एकरूप होतो, तेव्हा त्याच्या जीवनातील सर्व कार्ये सहजपणे घडू लागतात. ज्यावेळी आपल्या अंतरात हा आत्मप्रकाश उजळतो, तेव्हाच सहज समाधी लागते आणि जीवाचा शिवाशी खऱ्या अर्थाने योग घडून येतो.

# वारकरी संप्रदायात धर्मांध शक्तींची घुसखोरी!

## ६० टक्के लोकांची मांडणी प्रतिगामी विचारांना बळ देणारी : शरद पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची घुसखोरी झाल्याचे प्रतिपादन राज्यसभा खासदार आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केले. महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनानिमित्त प्रकाशित स्मरणिकेत शरद पवार यांच्याकडून याबाबत भाष्य करण्यात आले आहे. वारकरी संप्रदायात ६० टक्के लोकांची मांडणी धर्मांध शक्तींना बळ देणारी असल्याचे मत शरद पवारांनी मांडले. दुर्दैवाने या प्रबोधनाच्या मार्गावर कुठे महिला नाहीत, असल्याची खंतही शरद पवार यांनी व्यक्त केली.

महिला अधिकाऱ्यांचे पहिले अखिल भारतीय साहित्य संमेलन शनिवारी दिल्लीत पार पडत आहे. थोड्याच वेळात ग्रंथदिंडीला सुरुवात होणार आहे. शनिवारी संध्याकाळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

या साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेत केंद्रीय मंत्री असताना महिलांसाठी वेगळे धोरण आखण्याची गरज तुम्हाला का भासली, यावरही शरद पवार यांनी भाष्य केले आहे. माझ्यावर काही व्यक्तींचा अत्यंत प्रभाव आहे. त्यातील एक म्हणजे माझी आई. त्याकाळी जिल्हा लोक बोर्डात महिला प्रतिनिधीसाठी एक जागा असायची. त्या जागेवरुन संपूर्ण जिल्ह्यातून माझी आई निवडून आली होती. तिचे वैशिष्ट्य म्हणजे ती एकही बैठक चुकवायची नाही. अभ्यास करुन जायची. त्याकाळी प्रवासाची साधने नसायची. खासगी मोटर सर्व्हिस होती, एसटी नसायची, असे शरद पवार यांनी म्हटले. **(पान ४ वर)**

### मौलाना शरद पवारांना वारकरी संप्रदाय धर्मांध वाटू लागलाय....



हिंदू धर्माचा आणि वारकरी संप्रदायाचा कायम द्वेष करणाऱ्या मौलाना शरद पवारांना आता वारकरी संप्रदाय धर्मांध वाटू लागला आहे. जेव्हा तुम्ही जाळीदार टोपी घालून त्या लोकांसोबत इफ्तार पार्ट्या झोडतात ते तुम्हाला धर्मांध वाटत नाही. पण राम कृष्ण हरी आणि ज्ञानोबा तुकोबांचा गजर करत सामाजिक समता जोपासणारा आमचा संप्रदाय तुम्हाला धर्मांध वाटायला लागलेला आहे. तुम्ही आयुष्यभर वारकरी संप्रदाय हिंदू धर्मापासून तोडण्यासाठी कारस्थानं केलीत. आता ४०-५० लोकांची टोळी त्यासाठी तयार केलेली आहे. पण, लक्षात ठेवा हा तुषार भोसले जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत तुमचे षडयंत्र मी शिजू देणार नाही.

– तुषार भोसले, भाजपच्या अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख

### धर्मांध शक्ती वारकरी संप्रदायात नाही: नवनाथ बन



भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी म्हटले आहे की, चिकित्सा करण्याचा त्यांना अधिकार आहे. अर्बन नक्षल देखील वारकरी संप्रदायात आली होती. त्याचा देखील तपास शरद पवार यांच्या रिसर्च टीमनं केला पाहिजे. वारकरी संप्रदायात लोकांचे प्रबोधन करणं याला महत्त्व असतं. अर्बन नक्षल यात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत आहेत. यात किती शिरलेत याची माहिती देखील आपण समोर ठेवावी. धर्मांध शक्ती वारकरी संप्रदायात नाही, लव्ह जिहाद काहींकडून केला जातो. यावर मात्र शरद पवार बोलत नाहीत. प्रबोधन केलं जाते, त्याला धर्मांधता म्हणत नाही. विठ्ठलाची आराधना करणं धर्मांधता नाही, अशी टीका त्यांनी केलीय.

## अध्यात्मिक आचार्याला उर बडवायची गरज नाही : अमोल मिटकरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** शरद पवार यांच्या कर्तव्याचे समर्थन करताना आमदारा अमोल मिटकरी यांनी आचार्य तुषार भोसले यांच्यावर जहरी शब्दात टीका केली. अलिकडे मागील तीन महिन्यात लिंगपिसाट अशोक खरात नावाच्या धर्मबुडव्याला जेंव्हा पांडुरंगाची उपमा दिल्या गेली तेव्हा वाईट न वाटणारे आता ओरडत आहेत, असे ते म्हणाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर मधील दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा गुंजाळ महाराज ज्याने १७ वर्षीय मुलीवर अत्याचार केले तेव्हा आंदोलन न करणारे आता कसे बोलतात. आळंदीमध्ये केळगाव रस्त्यावर असलेल्या खाजगी वारकरी शिक्षण संस्थेमध्ये मुलीला डांबून ठेवत अत्याचार केले गेले. तेव्हा शांत बसणारे असे जे काही कथित प्रतिगामी आहेत त्यांचीच टक्केवारी पवार साहेबांनी मांडली जी ६० टक्क्यांपेक्षाही अधिक असेल असे मिटकरी म्हणाले. त्यामुळं अध्यात्मिक आचार्याला उर बडवायची गरज नाही असेही आ. अमोल मिटकरी म्हणाले.



**वारकरी संप्रदायातील ६० टक्के महाराज हे प्रतिगामी विचारांचे असल्याचे वक्तव्य ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलं आहे. यावरुन महाराष्ट्रात शरद पवारांच्या विरोधात काही वारकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. मात्र, शरद पवारांच्या समर्थनार्थ आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे माजी आमदार अमोल मिटकरी पुढे सरसावलेत. त्यांनी शरद पवारांनी केलेलं वक्तव्य एकदम बरोबर असल्यास म्हटलं आहे. पवार साहेबांनी मांडलेल्या ६० टक्के आकडेवारीपेक्षा ही संख्या अधिक असल्याचा आमदार मिटकरी म्हणालेत.**

### महत्त्वाचे..

### ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना हृदयविकाराचा झटका

मुंबई : भारतीय संगीतविश्वातील ज्येष्ठ आणि दिग्गज गायिका आशा भोसले यांच्या प्रकृतीसंदर्भात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. छातीत दुखणे व अस्वस्थता जाणवू लागल्याने त्यांना शनिवारी (दि. ११ एप्रिल) सकाळी तातडीने मुंबईतील ब्रिज कँडी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र, त्यांच्या प्रकृतीबाबत अद्याप अधिकृत वैद्यकीय बुलेटिन प्रसिद्ध करण्यात आलेले नाही. ९२ वर्षीय आशा भोसले या आजही संगीत क्षेत्रात सक्रिय असून, त्यांच्या आरोग्याबाबतची बातमी समोर येताच चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# .. तर महाराष्ट्रदिनी थेट 'कब्जा आंदोलन'

## पालकमंत्र्यांच्या आश्वासनानंतर 'आकारी पडीत'ग्रस्तांचे 'जेलभरो' आंदोलन तूर्तास मागे





आकारी पडितग्रस्त शेतकऱ्यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या आवारात चुली पेटवून जेल भरो आंदोलन केले. (छाया. भाऊसाहेब काळे व सरताज सय्यद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** न्यायालयाचा निकाल लागूनही हक्काच्या जमिनींपासून वंचित असलेल्या श्रीरामपूर तालुक्यातील ९ गावांतील अकारी पडीत शेतकऱ्यांचा संयम अखेर सुटला. शेतकरी संघटना व संघर्ष समितीच्या वतीने श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यासमोर पुकारलेले ऐतिहासिक 'जेलभरो' आंदोलन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मध्यस्थीनंतर मागे घेण्यात आले आहे. मात्र, येत्या २३ एप्रिल रोजी मुंबईत होणाऱ्या विशेष बैठकीत सकारात्मक निर्णय झाला नाही, तर महाराष्ट्रदिनी, १ मे रोजी थेट जमिनींचा ताबा घेणार, असा कडक इशारा शेतकरी नेते अॅड. अजित काळे यांनी दिला आहे.

आपल्या गुराढोरांसह आणि कुटुंबासह आंदोलनात उतरलेल्या शेतकऱ्यांनी सोमवारी प्रशासनाला जेरीस आणले. पोलिसांनी कलम १६८ अन्वये नोटिसा बजावूनही त्याला न जुमानता शेतकऱ्यांनी पोलीस ठाण्याच्या आवारातच चुली मांडून स्वयंपाक केला. 'जमिनी आमच्या हक्काच्या, नाही कुणाच्या बापाच्या' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

अकारी पडीत शेतकरी संघर्ष समितीने आपले आंदोलन करू नये, याबाबतचा **(पान ४ वर)**

### आता 'आरपारची' लढाई

बैठकीत होणारा निर्णय मान्य नसेल, तर शेतकरी पुढील दिशा ठरवण्यास स्वतंत्र असतील, असे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. यावर भाष्य करताना अॅड. अजित काळे म्हणाले की, आम्ही पालकमंत्र्यांच्या सूचनेचा मान राखून २३ तारखेच्या बैठकीला उपस्थित राहू. परंतु, वर्षानुवर्षे सुरू असलेली ही शेतकऱ्यांची चेष्टा थांबली पाहिजे. जर या बैठकीत ठोस निकाल लागला नाही, तर महाराष्ट्र दिनी (१ मे) सर्व शेतकरी आपल्या अकारी पडीत जमिनींवर थेट 'कब्जा आंदोलन' करतील. या आंदोलनामुळे प्रशासनाची मोठी धावपळ उडाली असून, संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आता २३ एप्रिलच्या मुंबईतील बैठकीकडे लागले आहे.

## नांदूरमध्ये तरुणीची गळफास घेत आत्महत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**ममदापूर :** राहता तालुक्यातील नांदूर येथे एका १७ वर्षीय तरुणीने राहत्या घरी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. तिने हे टोकाचे पाऊल कशामुळे उचलले हे मात्र अद्याप समजू शकले नाही. शिवानी नवनाथ कांबळे असे तरुणीचे नाव असून तिचा अतिशय धाडशी व मनमिळाव स्वभाव होता. सदर तरुणीने कराटे मध्ये प्राविण्य मिळवले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत तरुणीने नुकतेच श्रीरामपूर येथे इयत्ता बारावीमध्ये प्रवेश घेतला होता. घटनेच्या दिवशी तिची आई कामासाठी बाहेर गेली होती तर वडील देखील ट्रक ड्रायव्हर असल्याने बाहेरगावी होते, तर भाऊ शाळेत गेला होता. दुपारी घरी कोणीही नसताना तिने खोलीत छताच्या लोखंडी पाईपला ओढणीच्या सहाय्याने गळफास लावून घेतला. दुपारी तिचा भाऊ शाळेतून घरी आला असता सदर प्रकार त्याच्या लक्षात आला, घटना घडली तेव्हा दरवाजा उघडाच होता. घटनेची माहिती **(पान ४ वर)**

# अभिजात मराठी आणि स्थानिक बोली यांच्यातील दरी रुंदावतेय...

## 'युनेस्को'च्या अहवालाने शैक्षणिक धोरणातील गंभीर उणिवा आणल्या चव्हाट्यावर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मराठी भाषेला 'अभिजात' दर्जा मिळाल्याने राज्याचा गौरव वाढला असला तरी 'युनेस्को'च्या ताज्या अहवालाने महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणातील आणखी काही गंभीर उणिवा चव्हाट्यावर आणल्या आहेत. तमिळ, तेलुगू, कन्नड आणि ओडिशासारखी राज्ये आपल्या मातृभाषेचे जतन करण्यासाठी शिक्षणात जे प्रयोग करत आहेत, त्या तुलनेत महाराष्ट्रात मात्र अभिजात मराठी आणि स्थानिक बोली यांच्यातील दरी रुंदावत चालली आहे. यावर अहवालाने नेमके बोट ठेवले आहे.

अहवालात ओडिशा राज्याचा विशेष गौरव करण्यात आला आहे. ओडिशाने २१ आदिवासी बोलीभाषांमध्ये पाठ्यपुस्तके तयार केली आहेत. तिथे मुलांना बोलीभाषेतूनच प्राथमिक शिक्षण दिले जाते. महाराष्ट्रातही ६० हून अधिक समृद्ध बोलीभाषा श्वास घेत आहेत. सध्या देशात मराठीसह ११ भाषांना अभिजात दर्जा आहे. मात्र, युनेस्कोच्या मते, मूल्यमापन मात्र आजही प्रमाण भाषेतनच होते.

मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याच्या उत्सवात मशगूल असलेल्या धोरणकर्त्यांना युनेस्कोने आरसाच दाखवला आहे. राज्यात निर्माण झालेली डिजिटल




विषमता भयंकर असून, डिजिटल साधनांमध्ये स्थानिक बोलींचा समावेश नसल्याने ७० टक्के ग्रामीण विद्यार्थी मुख्य प्रवाहाच्या मागे फेकले गेले आहेत.

तामिळनाडू आणि कर्नाटकसारखी राज्ये आपल्या शिक्षकांना बोलीभाषेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देत असताना महाराष्ट्र मात्र शिक्षकांना या भाषिक युद्धात कोणत्याही प्रशिक्षणाविना उतरवत आहे.

निपुण' कार्यक्रमांतर्गत मुलांना त्यांच्या बोलीभाषेसह स्वीकारणे किती आवश्यक आहे, हे यंत्रणेला समजले असले तरी अंमलबजावणीत मोठा अडथळा आहे. या चाचण्या मोबाइल ॲपवर होतात. मुले भाषा आणि गणिताची उत्तरे त्यांच्या स्थानिक बोलीतील उच्चारणांनुसार देतात; मात्र ॲपला केवळ प्रमाण मराठीत उत्तर अपेक्षित असल्याने उत्तर योग्य असूनही 'अल्गोरिदम' त्यांना चूक ठरवते. महाराष्ट्रात वऱ्हाडी, **(पान ४ वर)**

### राज्यात भाषिक आराखडा तयार करावा

**शाळांच्या पाट्या मराठीत करून किंवा कागदी परिपत्रके काढून मातृभाषा धोरण यशस्वी होणार नाही. त्यासाठी 'लोकल टू ग्लोबल' संकल्पना राबविण्यासाठी पाठ्यपुस्तकांत स्थानिक संदर्भआणि बोलीभाषेतील शब्दांचा सन्मानाने समावेश हवा. प्राथमिक स्तरावर मुलांच्या स्वतःच्या भाषेत उत्तर देण्याचे स्वातंत्र्य असावे. ओडिशाच्या धर्तीवर राज्यात भाषिक आराखडा तयार करायला हवा.**

**महाराष्ट्राने 'अभिजात' दर्जाच्या भिंती नक्कीच बांधाव्यात, पण त्याआधी बोलींच्या भक्कम पायावर उभ्या असलेल्या ग्रामीण पोरांचा गळा घोटणे थांबवावे. पाया कच्चा ठेवून शिखरावर सोन्याचा कळस चढवू नये.**

**– शिक्षणतज्ज्ञ, शैक्षणिक धोरण अभ्यास गट**

माता, भगिनी, युवती व विद्यार्थीनींना आवाहन

विराट हिंदू संमेलन



प्रमुख मार्गदर्शक, उपस्थिती, वक्ते

प. पू. स्वामी श्री गोविंददेवगिरीजी महाराज
श्रीराम मंदिर अयोध्या व श्रीकृष्ण मंदिर मथुरा चे सर्वेसर्वा

प. पू. महंत श्री रामगिरीजी महाराज
मठाधिपती, श्रीक्षेत्र गोदावरीधाम बेट सराला

मा. डॉ. श्री. जयंतीभाई भाडेसिया
पश्चिम भारत क्षेत्र संघचालक, रा.स्व संघ मोरबी (गुजरात)

सदरील विराट हिंदू संमेलनास सर्व हिंदू माता, भगिनी, युवतींनी व विद्यार्थीनींनी एकजुटीने हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे. हि विनंती.

हनुमान मंदिर, रेल्वे स्टेशन पासून दुपारी ठीक ४.३० वा. शोभायात्रा निघेल. कार्यक्रमानंतर महाप्रसाद होईल.

* वेळ : सोमवार दि.१३/०४/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा.
* ठिकाण : थत्ते मैदान, वॉर्ड नं.७, श्रीरामपूर

महिला निमंत्रक : सौ.देवयाणी केशवकुमार काळे,
विराट हिंदू संमेलन समिती, श्रीरामपूर, व अखंड हिंदू समाज

## संपादकीय

# विकासाची 'बालवाडी' आणि शिक्षणाची अनास्था

भारताने २०४७ पर्यंत 'विकसित राष्ट्र' होण्याचे महत्त्वाकांक्षी स्वप्न उराशी बाळगले आहे. कोणत्याही देशाच्या विकासाचा महामार्ग हा त्या देशाच्या शिक्षण व्यवस्थेतून जातो, हे त्रिकालबाधित सत्य आहे. मात्र, गेल्या आठवडाभरात शिक्षण क्षेत्राशी संबंधित ज्या काही बातम्या समोर आल्या आहेत, त्या पाहता सरकार या क्षेत्राकडे कितपत गांभीर्याने पाहते, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. विकसित भारताचा डोलारा ज्या पायावर उभा राहणार आहे, तो पायाच जर अनास्थेच्या वाळवीने पोखरलेला असेल, तर प्रगतीची उंच इमारत उभी राहणार कशी? सध्याच्या स्थितीचे वर्णन करायचे झाले तर दुर्दैवाने असे म्हणावे लागेल की, आपल्या विकासाच्या गप्पा मोठ्या असल्या तरी प्रत्यक्ष कृती मात्र अजून 'बालवाडी'तच अडकून पडली आहे.

देशातील शिक्षण व्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या 'समग्र शिक्षा योजने'ची सध्याची अवस्था ही सरकारी अनास्थेचे उत्तम उदाहरण आहे. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या सुमारे २५ कोटी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित असलेल्या या योजनेसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात केवळ २ टक्के वाढ सुचवण्यात आली. आर्थिक तरतूद अपुरी असतानाच प्रशासकीय पातळीवरही आनंदीआनंदच आहे. १ एप्रिलपासून नवीन आर्थिक वर्ष सुरू झाले, तरी महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला ३१ मार्चपर्यंत केंद्राकडून या योजनेबाबत कोणतीही स्पष्टता देण्यात आली नव्हती. याचा थेट फटका या योजनेंतर्गत काम करणाऱ्या सुमारे ३८०० कंत्राटी कर्मचाऱ्यांना बसला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हे कर्मचारी सेवा कायम करण्याच्या मागणीसाठी लढा देत आहेत, मात्र त्यांच्या आंदोलनाकडे 'वाटाण्याच्या अक्षता' लावत दुर्लक्ष केले जात आहे.

मुळात, 'समग्र शिक्षा योजने'चे मुख्य उद्दिष्ट नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि शिक्षण हक्क कायद्याची (आर.टी.ई.) प्रभावी अंमलबजावणी करणे हे आहे. भौतिक सुविधांपासून ते तंत्रज्ञान सुविधेपर्यंत सर्व आघाड्यांवर ही योजना महत्त्वाची आहे. अशा योजनेचा कणा असलेले कर्मचारीच जर असुरक्षिततेच्या छायेखाली असतील, तर धोरणांची अंमलबजावणी होणार कशी? पश्चिम बंगाल किंवा तामिळनाडूमध्ये केंद्र-राज्य संघर्षाचा फटका या योजनांना बसतो हे समजण्यासारखे आहे, परंतु महाराष्ट्रात 'डबल इंजिन' सरकार असूनही जर गोंधळाची स्थिती असेल, तर ती राज्याच्या शैक्षणिक आरोग्यासाठी चिंताजनक आहे.

शालेय शिक्षणासोबतच पूर्व-प्राथमिक म्हणजेच 'बालवाडी' शिक्षणाचा प्रश्नही तितकाच गंभीर बनला आहे. नवीन शैक्षणिक धोरणाने तीन ते सहा वर्षे वयोगटातील मुलांचा समावेश औपचारिक शिक्षणाच्या पायाभूत स्तरात केला आहे. त्यासाठी नियमावली तयार आहे, अभ्यासक्रम तयार आहे, पण गाडी अडकली आहे ती सरकारच्या अंतिम मंजुरीच्या फाईलमध्ये. या विलंबाचा फायदा घेऊन खासगी शाळांनी शिक्षणाचे बाजारीकरण सुरू केले आहे. नर्सरी, केजी अशा गोंडस नावाखाली पालकांकडून अवाढव्य शुल्क उकळले जात आहे. शिक्षण हक्क कायद्यातील ६ ते १४ वर्षे वयोगटाच्या तांत्रिकतेचा आधार घेत, आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या २५ टक्के आरक्षणाला या स्तरावर हरताळ फासला जात आहे. सरकारने या नियमावलीवर तातडीने मोहोर उमटवून खासगी शाळांच्या मनमानीला लगाम घालणे गरजेचे आहे, अन्यथा सर्वसामान्यांची मुले दर्जेदार पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून कायमची वंचित राहतील.

या साऱ्या गोंधळात तिसरी महत्त्वाची बातमी आली ती म्हणजे, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेला (एनसीईआरटी) मिळालेला 'अभिमत विद्यापीठा'चा दर्जा. सैद्धान्तिकदृष्ट्या हा निर्णय स्वागतार्ह वाटू शकतो. यामुळे 'एनसीईआरटी'ला स्वतःचे पदवी आणि पीएचडी अभ्यासक्रम सुरू करता येतील, संशोधनाला चालना मिळेल. मात्र, या निर्णयाच्या आड दडलेली 'धोरणात्मक मेख' विसरून चालणार नाही. गेल्या काही काळापासून 'एनसीईआरटी'ने अभ्यासक्रमात केलेल्या 'सुधारणा' वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. इतिहासाच्या पुस्तकातून मुघल काळ वगळणे, राज्यशास्त्रातून लोकशाही चळवळींचे संदर्भ काढून टाकणे किंवा विज्ञानातून डार्विनच्या उत्क्रांतीवादाला फाटा देणे, हे सर्व कोणत्या विचारसरणीतून घडत आहे, हे उघड आहे.

आता जर हीच संस्था शिक्षकांना प्रशिक्षण देऊन पदव्या देणार असेल, तर भविष्यातील शिक्षक कोणत्या विचारसरणीचे तयार होतील? लोकशाहीत शिक्षणाचे स्वरूप बहुआयामी आणि सर्वसमावेशक असावे लागते. जर शिक्षणच 'एकरेषीय' आणि 'सत्ताधारी धार्जिणे' झाले, तर स्वतंत्र विचारांची पिढी कशी घडणार? 'एनसीईआरटी'ला आयआयटीप्रमाणे 'राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेचा' दर्जा देण्याऐवजी 'यूजीसी'च्या नियंत्रणाखालील विद्यापीठ बनवणे, ही स्वायत्ततेवर गदा आणण्याची खेळी तर नाही ना, अशी शंका घेण्यास वाव आहे.

थोडक्यात सांगायचे तर, आपल्या देशातील शैक्षणिक धोरण हे कागदावर देखणे असले तरी अंमलबजावणीच्या पातळीवर ते अत्यंत भुसभुशीत आहे. निधीची कमतरता, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शोषण, खासगी शाळांचे अनिर्बंध लाड आणि स्वायत्त संस्थांचे राजकीयकरण यांमुळे शिक्षण व्यवस्थेची प्रकृती खालावली आहे. केवळ घोषणांनी किंवा अमृतकाळाच्या गप्पांनी देश विकसित होत नाही; त्यासाठी एका सशक्त, निधड्या आणि स्वतंत्र विचार करणाऱ्या सुशिक्षित पिढीची गरज असते. जोपर्यंत सरकार शिक्षण क्षेत्राकडे केवळ 'खर्च' म्हणून न पाहता 'गुंतवणूक' म्हणून पाहत नाही, तोपर्यंत विकसित भारताचे स्वप्न मृगजळच ठरेल. विकासाचा रथ पुढे न्यायचा असेल, तर आधी शिक्षणाच्या या पायाभूत प्रश्नांना 'बालवाडी'तून बाहेर काढून मुख्य प्रवाहात आणावे लागेल.

# वडगाव पान येथील 'दत्तधाम'च्या भोंदू बाबाचा पर्दाफाश करा

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पोलीस प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : अध्यात्माच्या आणि दैवी शक्तीच्या नावाखाली सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबांचे पेव फुटले असतानाच, आता संगमनेर तालुक्यातील वडगावपान (दत्तधाम) येथील एका स्वयंघोषित 'गडगे महाराज' याच्या विरोधात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीने (अनिस) आक्रमक पवित्रा घेतला आहे. या भोंदू बाबाकडून लोकांचे आर्थिक आणि मानसिक शोषण होत असून, त्याच्यावर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी अनिसने जिल्हाधिकारी व संगमनेर उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. त्यामुळे आता संगमनेर मध्ये देखील अशोक खरातच्या भोंदू गिरीची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



वडगावपान येथे 'दत्तधाम सरकार' या नावाने एक आश्रम चालवला जातो. या आश्रमात स्वतःला गडगे महाराज म्हणवून घेणारा एक व्यक्ती वास्तव्यास आहे. या बाबाकडे कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना तो आजार बरे करण्याचे दावे करतो आणि लोकांवर फसवे उपचार करतो, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आश्रमात मोठ्या प्रमाणावर स्त्री-पुरुषांची वर्दळ असते आणि अनेक जण तिथे मुक्कामाला ही राहतात. महाराष्ट्र अंनिसच्या वतीने ॲड. रंजना गवांदे, अशोक गवांदे, प्रशांत पानसरे आणि अमोल खरात यांनी पोलीस प्रशासनाकडे तक्रार केली आहे. त्यांच्या मते अध्यात्माच्या नावाखाली बाबा येणाऱ्या भक्तांकडून मोठी रक्कम उकळतो. या बाबाने परिसरात आपली दहशत निर्माण केली आहे. त्यामुळे फसवणूक झालेले शेकडो लोक तोंडी तक्रार करत असले तरी, भीतीपोटी कोणीही लेखी तक्रार देण्यास पुढे येत नाहीये. कोणताही वैद्यकीय आधार नसताना लोकांना औषधोपचार देऊन त्यांच्या जिवाशी खेळला जात आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणाचा पाठपुरावा २०२० पासून अंधश्रद्धा निर्मुलन समिती कडून सुरू आहे. वारंवार तोंडी सूचना देऊनही पोलीस प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यामुळे शासकीय यंत्रणेच्या भूमिकेबद्दल जनतेत संभ्रम आणि नाराजी निर्माण होत आहे. भविष्यात हे प्रकरण गंभीर वळण घेऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे.

'दत्तधाम सरकार' ही दुसरी 'खरात फाईल' होवू नये, यासाठी अनिसने महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानवीय, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा विरोधी कायदा, ड्रग्ज अँड मॅजिक रेमेडीज ॲक्ट (जादूटोणा सदृश औषधोपचार प्रतिबंधक कायदा), महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम (बोगस डॉक्टर्स ॲक्ट). भारतीय न्याय संहिता (इछड) कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.आता या गंभीर तक्रारीनंतर संगमनेर पोलीस प्रशासन या 'भोंदू बाबा'वर काय कारवाई करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

> आम्ही जनप्रबोधनासाठी आणि जादूटोणा विरोधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार आहोत. मात्र, या भोंदूगिरीचा तातडीने बिमोड होणे गरजेचे आहे.
>
> **` महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती.**

> दत्तधाम सरकारमध्ये काय चालते, हे येऊन पाहिले पाहिजे. आपल्याकडे प्रार्थना, संकल्प, ध्यानसाधना चालते. दत्त दिगंबर सेवाभावी संस्था आहे. संस्थेमध्ये तीन डॉक्टर आहेत. औषधी देण्यासाठी डॉक्टर असतात. ध्यानसाधना घेणे, मनातील नकारात्मकता ध्यान साधनेद्वारे बाहेर काढणे, हे माझे काम आहे. देव आपल्या हृदयात आहे, ही शिकवण आपल्याकडे आहे.
>
> **– गडगे महाराज, दत्तधाम सरकार, वडगाव पान, ता. संगमनेर**

> संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील गडगे महाराज (दत्तधाम सरकार) यांच्यावरील भोंदूगिरी संदर्भाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे निवेदन प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने शहानिशा करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
>
> **– डॉ. कुणाल सोनवणे, उपविभागीय पोलिस अधिकारी, संगमनेर उपविभाग**

# गतिमान युगातही फुलेंचे विचार प्रेरणादायी : डॉ. विलास खर्चे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठात महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय व विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने डॉ. नानासाहेब पवार सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी महात्मा फुलेंच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. आजचे युग विज्ञान व संशोधनाचे असले तरी फुलेंचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी व दिशादर्शक आहेत, असे त्यांनी नमूद केले. स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी फुलेंनी दिलेला लढा समाजासाठी मार्गदर्शक ठरल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे सचिन सूर्यवंशी यांनी फुलेंची दूरदृष्टी अधोरेखित करत, त्यांच्या विचारांची आजही उपयुक्तता कायम असल्याचे सांगितले. शेतीला विज्ञानाची जोड, जलसंधारण आणि समतेचा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मांडल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी व्यासपीठावर डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. कैलास कांबळे, व्ही. टी. पाटील, डॉ. पंडित खर्डे व डॉ. विलास आवारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुशाल सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन तृप्ती पाटील व विनया पाटील यांनी केले, तर आभार सुदर्शन लाटे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्त्री शिक्षणामुळे महिलांचा सर्व क्षेत्रांत ठसा;नीलम खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा भक्कम पाया रचला. त्यामुळेच आज महिलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या असून त्या विविध क्षेत्रांत आपला ठसा उमटवत आहेत, असे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी काढले.




महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त संगमनेर शहरातील त्यांच्या पुतळ्यास नीलम खताळ यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी भाजपच्या शहराध्यक्ष पायल ताजणे यांच्यासह अर्चना चिपाडे, सुवर्णा ताजणे, नम्रता अभंग, मीनल अभंग, रेखा गलांडे, संगीता पुंड, मनीषा अभंग, अश्विनी ढोले, जोती बालसराफ, सांगिता मंडलिक, जयश्री पुंड, सविता पावबाके, सुनीता माताडे, बंटी मंडलिक, किशोर ढोले आदींसह माळी समाजाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात माळीवाडा येथील मारुती मंदिरात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून करण्यात आली.

यावेळी बोलताना खताळ म्हणाल्या की, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी अंधश्रद्धा, जातिभेद आणि स्त्री-पुरुष असमानतेविरुद्ध लढा देत शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला. त्यांच्या कार्यामुळेच महिलांना शिक्षणाचा अधिकार मिळाला. आज त्या शिक्षणाच्या बळावर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारांचे अनुसरण करून समाजाने पुढे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# त्रिमूर्ती महाविद्यालयात विविध उपक्रमांनी महात्मा फुले जयंती साजरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या निर्देशानुसार नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, त्रिमूर्तीनगर येथे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरी करण्यात आली.



महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षाकडे वाटचाल सुरू असताना त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत मुलींच्या शिक्षणाविषयी जनजागृती करण्यासाठी बेटी बचाव, बेटी पढाव अभियानाअंतर्गत परिसरात रॅली काढण्यात आली या रॅलीद्वारे विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत समाजात स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. तसेच विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ठिकाणी श्रमदान करत स्वच्छता मोहिम राबविली. परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश देत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यात आली. या उपक्रमाला स्थानिक नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

याचबरोबर आधुनिक भारतातील समाजसुधारक / स्त्री शिक्षण या विषयावर वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. 'पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा.निकिता बर्गे,प्रा.अक्षय देवतरसे,प्रा.सोमनाथ खेडकर,प्रा. राहुल बोरुडे,प्रा.प्रवीण आवारे, प्रा.मंगेश वैरागर, प्रा.अनिकेत आरसुळे, प्रा.योगिता गायकवाड, प्रा.अश्विनी औटी,गायत्री ढाकिफळे यांच्यासह सर्व प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचा शंभर टक्के निकालाचा विक्रम कायम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : लोणी येथील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीने यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठामार्फत फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या द्वितीय, तृतीय व अंतिम वर्षाच्या परीक्षांमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली. प्राचार्य डॉ. रविंद्र जाधव यांनी ही माहिती देताना विद्यार्थ्यांच्या परिश्रमांसह प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले. हा निकाल संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीचा आणि सातत्यपूर्ण मेहनतीचा परिणाम असल्याचे त्यांनी सांगितले. द्वितीय वर्षात वैष्णवी लाड (८.७५) प्रथम, वेदिका हारदे (८.६७) द्वितीय, तर साक्षी सोनवणे (८.४२) तृतीय ठरली. तृतीय वर्षात राम बोऱ्हाडे (८.६२) प्रथम, सोनाली शेळके (८.३८) द्वितीय, तर तृतीय क्रमांकही सोनाली शेळके (८.३१) हिने मिळवला. अंतिम वर्षात समीक्षा औटी (८.९२) प्रथम, स्नेहल लाहरे, अनुष्का साठे व शिवानी आंबरे (८.८३) संयुक्त द्वितीय, तर साक्षी वनारसे (८.६७) तृतीय ठरली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# सोनगावात महात्मा फुले जयंती उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त सोनगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम पार पडला. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. महात्मा फुले चौकात आकर्षक सजावट करण्यात आली होती. यावेळी महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन ज्येष्ठ नागरिक व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.या प्रसंगी मुळा-प्रवरेचे माजी संचालक सुभाष पाटील अंत्रे, मच्छिंद्र अंत्रे, प्रवरा साखर कारखान्याचे माजी संचालक पाराजी धनवट, प्रकाश ताठे, माजी सरपंच बाळासाहेब अंत्रे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब अंत्रे, सरपंच अलका शिंदे, उपसरपंच एजाजभाई तांबोळी आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ व तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमातून महात्मा फुले यांच्या समता, शिक्षण व स्त्री सक्षमीकरणाच्या विचारांचा जागर करण्यात आला. त्यांच्या कार्याला अभिवादन करत सामाजिक परिवर्तनाचा संदेश देण्यात आला.




# रौप्यमहोत्सवी वर्षात राहुरी व्यापारी पतसंस्था २५ कोटींच्या दिशेने

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : राहुरी तालुका व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात २० लाख ३३ हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संस्थापक चेअरमन प्रकाश पारख यांनी ताळेबंद सभासदांसमोर जाहीर केला.

संस्थेकडे सध्या १८.२९ कोटी रुपयांच्या ठेवी असून १७.०७ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. ६.४८ कोटींची गुंतवणूक असून कर्जवसुली समाधानकारक आहे. एनपीए केवळ ४.२७ टक्के इतका आहे. संस्थेने स्थापनेपासून सभासदांना सातत्याने ११ टक्के लाभांश दिला असून लेखापरीक्षणात 'अ' वर्ग कायम राखला आहे. रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त २५ कोटी रुपयांच्या ठेवीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भागात शाखा विस्तार व युवकांना रोजगाराच्या संधी देण्याचे नियोजन असल्याचे उपाध्यक्ष प्रल्हाददास राठी यांनी सांगितले.

पुढील वर्षी सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. यावेळी संचालक व सभासद उपस्थित होते.

# श्रीरामपुरात शिवस्मारक परिसरात भगवा ध्वज उभारणीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील भाजी मंडई परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा परिसरात भव्य भगव्या ध्वजाची उभारणी करावी, अशी मागणी काँग्रेसचे शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी लोकनियुक्त नगराध्यक्ष करण ससाणे व मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्याकडे सादर केले.

शहरातील मध्यवर्ती ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाजी मंडई परिसरात शिवस्मारक असल्याने येथे दररोज नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. या ठिकाणी भव्य भगवा ध्वज उभारल्यास परिसराचे सौंदर्य वाढण्यासोबतच ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व अधिक अधोरेखित होईल, असा विश्वास डावखर यांनी व्यक्त केला.

या मागणीसंदर्भात नगराध्यक्ष करण ससाणे यांची समक्ष भेट घेण्यात आली असून त्यांनीही याबाबत सकारात्मक भूमिका दर्शवली आहे. लवकरच यावर निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिल्याचे डावखर यांनी सांगितले.

दरम्यान, या सार्वजनिक उपक्रमासाठी नगरपरिषदेला आवश्यक ते सहकार्य करण्यास आपण तयार असल्याचेही डावखर यांनी स्पष्ट केले.

# वंचित घटकांच्या हक्कांसाठी महात्मा फुलेंनी लढा दिला : पिपाडा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे शेतकरी, कामगार आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी सातत्याने लढा दिला असे मनोगत प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा ममता पिपाडा यांनी बोलताना व्यक्त केले. त्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती प्रसंगी बोलत होत्या. महात्मा ज्योतिबा फुलेंच्या प्रतिमेचे पुजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा नेते डॉ.राजेंद्र पिपाडा,आरपीआयचे दिलीप वाघमारे,मदनलाल पिपाडा,प्रगतशील शेतकरी शिवाजी आनप,महावीर पिपाडा,निखील पिपाडा,तिर्थम पिपाडा आदी यावेळी उपस्थित होते.



यावेळी ममता पिपाडा पुढे म्हणाल्या की, भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनामध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यांनी शिक्षण, समता आणि सामाजिक न्याय यासाठी आयुष्यभर संघर्ष केला.

महात्मा फुले यांनी १८४८ साली मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून शिक्षणाचा नवा अध्याय सुरू केला. त्या काळात स्त्रीशिक्षणाला विरोध असतानाही त्यांनी धाडसाने पुढाकार घेतला. त्यांच्या या कार्यात सावित्रीबाई फुले यांनीही मोठे योगदान दिले. फुले यांनी जातिव्यवस्था, अंधश्रद्धा आणि सामाजिक अन्यायाविरोधात आवाज उठवला. सत्यशोधक समाज स्थापन करून त्यांनी समाजात समानता आणि बंधुता वाढवण्याचा प्रयत्न केला. तसेच गुलामगिरी सारख्या ग्रंथातून त्यांनी शोषण व्यवस्थेवर टीका केली.

आजच्या काळातही महात्मा फुले यांचे विचार तितकेच महत्त्वाचे आहेत. समाजातील विषमता दूर करण्यासाठी आणि समानतेवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांची गरज आहे. असेही ममता पिपाडा यावेळी बोलतना म्हटल्या.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## पद्मश्री विखे महाविद्यालयाची विद्यार्थीनी निर्मळ सहा. विक्रीकर निरीक्षक पदी

**प्रवरानगर:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेत शासनाच्या वर्ग एक सहाय्यक विक्रीकर निरीक्षक पदी निवड लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या पद्मश्री डॉ. विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी वदा बाळासाहेब निर्मळ यांची निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.डि. एन. घोलप यांनी दिली.वृंदा निर्मळ ही पद्मश्री विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या २०१९ च्या बॅचची माजी विद्यार्थिनी. वृंदा हिने बारावीनंतर शासकीय कृषी महाविद्यालय धुळे या ठिकाणी बीएससी ॲग्री पदवी संपादन केली. पुणे या ठिकाणी स्पर्धा परीक्षेचा कसून अभ्यास केला. प्रचंड संघर्ष आणि मेहनतीच्या जोरावर वृंदा यांना हे यश मिळाले. तिच्या तिच्या यशाचे संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका सौ. लीलावती सरोदे डॉ. आर.ए. पवार यांनी अभिनंदन केले आहे.

## भोकरला छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर शुभारंभ

**शिरसगाव :**भोकर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरचा शुभारंभ अखिल भारतीय माहनूभाव पंथाचे अध्यक्ष कारंजेकरबाबा व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेश परजणे यांच्या हस्ते व कार्यक्रमाचे अध्यक्ष महानुभाव पंथाचे गुंफेकर बाबा यांच्या हस्ते करण्यात आला. यांप्रसंगी शिर्डीचे अप्पर जिल्हाधिकारी कोळेकर ,प्रांत किरण सावंत ,आणासाहेब कडू,तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, गटविकास अधिकारी म्हस्के ,भूमी अभिलेख उपअधीक्षक खराटे ,यांच्या सह महसूल अधिकारी , पदाधिकारी व शंकरराव मुठे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. टाकळीभान मंडल अधिकारी कार्यालय अंतर्गत गावातील लाभार्थ्यांना कृषी अवजारे तसेच शासकीय विविध योजनांचे प्रमाण पत्राचे वितरण करंजीकर बाबाच्या यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना पुन्हा सुरु करावी अशी मागणी जेष्ठ नागरिक संघटना उपाध्यक्ष वसंतराव मुठे यांनी केली.




## हरिगाव येथे महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**शिरसगाव :** हरिगाव येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त शनिवारी अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमात विविध मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तालुका पोलीस उपनिरीक्षक अरुण धनवडे, हरेगाव जनहित विकास समिती व सूर्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनिल शिनगारे, आकाश सूर्यवंशी, ग्रामसेवक प्रदीप ढुंमणे, उपसरपंच दिलीप त्रिभुवन, समिती मुखप्रवर्तक सुनिल पवार, रमेश भालेराव, विनायक वाघमारे, संदीप धनेधर, अतुल भालेराव, राजेश चव्हाण, डॉ. नंदकुमार वाघमारे, अय्याज शेख, खालिद पठाण, संतोष तुपे तसेच पोलीस अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायतचे सचिन गांगुर्डे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांनी महात्मा फुले व डॉ. आंबेडकर ांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सुनिल शिनगारे यांनी प्रास्ताविकात महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला. उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आकाश सूर्यवंशी यांनी केले.

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात



**शिर्डी :** राहाता तालुक्यातील निघोज येथील गाडेकर मळा परिसरात विघ्नहर्ता सावता ग्रुपच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास परिसरातील नागरिक, युवक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक व समतावादी विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रुती रघुनाथ गाडेकर व भक्ती रमेश दिवेकर यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विघ्नहर्ता सावता ग्रुपच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# क्रांतिसूर्य फुले द्विशताब्दीला 'सामाजिक समता वर्ष'ची घोषणा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** ''क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष राज्य सरकारने 'सामाजिक समता व समरसता वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. महात्मा फुलेंच्या जयंतीचे २०० वे वर्ष साजरे होणे, हा सर्वांसाठी अभिमानाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे. सामाजिक परिवर्तनासाठी त्यांच्या विचारांची आज नितांत गरज असून, त्यांनी दिलेला शिक्षणाचा वसा आणि समानतेचा विचार कृतीत आणण्यासाठी आपण सर्वांनी कटिबद्ध होऊन काम करावे लागेल,'' असे प्रतिपादन जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ना. विखे यांनी लोणी येथील जनसंपर्क कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. यांप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, ''महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे २०० वे वर्ष आपण यावर्षी साजरे करत आहोत. हे वर्ष सर्वांच्याच दृष्टीने ऐतिहासिक असून, राज्य सरकारने हे वर्ष 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.''

ते पुढे म्हणाले की, ''महात्मा फुले यांचे संपूर्ण जीवन समाजासाठी समर्पित होते. शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षणाची संधी दिली, ज्यामुळे स्त्री-शिक्षणाचा पाया मजबूत झाला. त्यांचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते, तर समाजातील प्रत्येक घटकाच्या न्यायासाठी त्यांनी संघर्ष केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' ओढून शोषणाविरुद्ध आवाज उठवला. समाजातील दीन-दलित आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. पिण्याच्या पाण्यासाठी स्वतःच्या घरातील हौद सर्वांसाठी खुला करून त्यांनी समानतेचा संदेश आपल्या कृतीतून दिला.''

''समाजामध्ये आजही अंधश्रद्धेमुळे फसवणूक होणाऱ्यांची संख्या मोठी आहे. याविरुद्ध त्यांनी प्रखर मते मांडून समाजाला अंधश्रद्धेपासून दूर नेण्याचा यशस्वी प्रयत्न केला. शिक्षणासोबतच समाजातील विषमता दूर करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा वारसा आपल्याला पुढे न्यावा लागेल,'' अशी अपेक्षाही मंत्री विखे यांनी यावेळी व्यक्त केली.



## विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे : बाळासाहेब थोरात

### अमृतवाहिनी संस्थेत नेतृत्व विकास शिबिर संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** आजचे युग आधुनिक तंत्रज्ञानाचे असून विद्यार्थ्यांनी एआयसह नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून स्वतःची शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले. अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेत आयोजित पाच दिवसीय नेतृत्व विकास शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, उद्योजक व आरोह न्यूट्रीचेम प्रा. लि.चे संस्थापक डॉ. रोहित दुबे पाटील, कविता दुबे, डॉ. प्रतिमा खंडेलवाल, संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्रा. व्ही. बी. धुमाळ, डॉ. जे. बी. गुरव आदी मान्यवर उपस्थित होते.

थोरात यांनी अमृतवाहिनी संस्थेच्या गुणवत्तेचा गौरव करत, या संस्थेतील विद्यार्थी देश-विदेशात उच्च पदांवर कार्यरत असल्याचे सांगितले. बदलत्या युगात तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे, नवकल्पनांचा स्वीकार करणे आणि अद्ययावत राहणे ही यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. सुधीर तांबे यांनी संस्थेच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक करत, अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला दिशा मिळते, असे सांगितले. डॉ. प्रतिमा खंडेलवाल यांनी नेतृत्वासाठी सहानुभूती, सक्रिय श्रवण व सहयोग यांचे महत्त्व पटवून दिले. तर डॉ. रोहित दुबे यांनी ब्रँडिंग, कौशल्य व सकारात्मक दृष्टिकोन यांवर मार्गदर्शन केले.

समारोपावेळी विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी कृती आराखडे सादर केले. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. वृषाली साबळे व डॉ. सचिन खर्डे यांनी परिश्रम घेतले.

## क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्यामुळेच सामाजिक क्रांती : माजी आ.मुरकुटे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्यामुळेच सामाजिक क्रांती झाली. त्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. शिक्षण व ज्ञानामुळेच बहुजन समाजात परिवर्तन घडेल, अशी त्यांची धारणा होती. शेती क्षेत्राची त्यांनी अर्थशास्त्रिय मांडणी केली. शेतक-यांची दूरवस्था तसेच पाणी प्रश्नाबाबात त्यांनी ब्रिटिश सरकारचे कान टोचले. सत्यशोधक समाजाची स्थापना करुन त्यांनी त्या माध्यमातून समाज प्रबोधनाची चळवळ उभी केली. महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या सामाजिक पिछेहाटीच्या काळात अधिक गरज आहे, असे प्रतिपादन अशोक साखर कारखान्याचे चेअरमन माजी आ.भानुदास मुरकुटे यांनी केले.



शिवसेना आणि लोकसेवा विकास आघाडीच्या वतीने श्रीरामपूर येथे महात्मा ज्योतिबा फुले यांचे जयंती निमित्त माजी आ.मुरकुटे यांचे हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले. यांप्रसंगी नगरसेवक संतोष कांबळे, लकी सेठी, नाना पाटील, मार्केट कमिटीचे माजी संचालक रमेश सोनवणे, पत्रकार चंद्रकांत झुरंगे, आरोग्य मित्र सुभाष गायकवाड, रोहित मालकर, गणेश छल्लारे, अमोल कोलते, स्वप्नील मुरकुटे आदी उपस्थित होते.

## पाण्याच्या प्रश्नावर अभियंत्यांची एकजूट जलसंकटावर उपाययोजनांसाठी पुढाकार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** - भारतात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या पाणी प्रश्नावर उपाय शोधण्यासाठी अभियंत्यांची एकजूट होत असल्याचे सकारात्मक चित्र समोर आले आहे. पाण्याची उपलब्धता, वापर, वाटप, संवर्धन आणि वाढते प्रदूषण या सर्व बाबींवर व्यापक चर्चा व जनजागृतीची गरज अधोरेखित करण्यात आली. १९६८ मध्ये स्थापन झालेली इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन ही देशातील अग्रगण्य संस्था असून तिचे देशभरात ३९ केंद्रे कार्यरत आहेत. सुमारे १४ हजारांहून अधिक अभियंते या संस्थेशी जोडलेले आहेत. दरवर्षी जानेवारी महिन्यात तीन दिवसीय परिषदेत पाणी विषयक तांत्रिक, प्रशासकीय आणि सामाजिक पैलूंवर सखोल चर्चा केली जाते. महाराष्ट्रात मुंबई नंतर पुणे हे या संस्थेचे मोठे केंद्र मानले जाते. पुणे सेंटरच्या चेअरमन तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभागाच्या मुख्य अभियंता वैशाली आवटे यांनी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत धुमाळ यांची भेट घेत जलक्षेत्रातील समस्या व दीर्घकालीन उपाययोजनांवर सविस्तर चर्चा केली.या बैठकीत आवटे यांनी जलसंपदा विभागातील अभियंत्यांनी मोठ्या माणावर या संघटनेत सहभागी होण्याचे आवाहन केले. अभियंत्यांचे संघटन मजबूत झाल्यास भविष्यातील जलसंकटावर प्रभावी उपाय शोधणे आणि ते प्रत्यक्षात राबवणे शक्य होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या संस्थेचे जागतिक पातळीवरील अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशन, ग्लोबल वॉटर पार्टनरशिप आणि आंतरराष्ट्रीय जल संघटना यांसारख्या संस्थांशी संबंध असल्याची माहितीही त्यांनी दिली. संस्थेचे सचिव डॉ. दयानंद पानसे यांनी संस्थेच्या कार्याची व्याप्ती, तांत्रिक माहितीचा लाभ आणि समाजहितासाठी होणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. डॉ. हेमंत धुमाळ यांनी सकारात्मक भूमिका घेत जलसंपदा विभागाकडून जनजागृतीचे उपक्रम राबवले जातील आणि अभियंते सक्रिय सहभाग घेतील,असे आश्वासन दिले.पाणी प्रश्न अधिक जटिल होत असल्याने शासकीय, अशासकीय संस्था, शैक्षणिक क्षेत्र आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्र येणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी राजेंद्र माहुलकर, व्ही. एन. शिंदे, ढोबळे, अवचट, चंदनशिवे, खजिनदार अनिल पाटील तसेच विविध अभियंते व शिरूर मधील पाणी वापर संस्थाचे प्रतिनिधी प्रकाश वायसे आवर्जून उपस्थित होते.बैठकीच्या शेवटी खजिनदार अनिल पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.एकत्रित प्रयत्न आणि जागरूकतेतूनच भविष्यातील जलसंकटावर मात शक्य करणे शक्य होईल असा आशावाद या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

## पुणतांबा-जळगाव शिवरस्ता अतिक्रमणाच्या विळख्यात; नागरिक त्रस्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** परिसरातील ग्रामस्थांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा पुणतांबा-जळगाव शिवरस्ता सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात सापडला असून, वाहतुकीसाठी तो दिवसेंदिवस अरुंद होत चालला आहे. सुमारे पावणेतीन किलोमीटर लांबीच्या या रस्त्याची मूळ रुंदी अंदाजे ६६ फूट असताना, काही ठिकाणी ती अवघी सहा फूटांवर आली आहे.

शेती महामंडळाच्या चांगदेवनगर मळ्याची स्थापना जुलै १९६३ मध्ये झाल्यानंतर ऊस वाहतुकीसाठी हा रस्ता तयार करण्यात आला होता. मळ्यातील १७, १८ व १९ वाडीतील कामगार, यंत्रसामग्री, खतांची वाहतूक तसेच परिसरातील ग्रामस्थांच्या दळणवळणासाठी हा रस्ता अत्यंत उपयुक्त ठरला होता. पुणतांबा, जळगाव, रामपूरवाडी, येलमवाडी या गावांसाठीही हा रस्ता महत्त्वाचा आहे.

मात्र सध्या अतिक्रमणामुळे या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून, लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. राज्य सरकारकडून पाणंद व शिवार रस्त्यांच्या दुरुस्ती, रुंदीकरण व डांबरीकरणासाठी निधी उपलब्ध करून दिला जात असतानाही या रस्त्याचा त्यात समावेश का होत नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

ग्रामपंचायतीने काही ठिकाणी मुरूमीकरण केले असले तरी या शिवरस्त्याकडे दुर्लक्ष झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. पावसाळ्यात रस्त्याची अवस्था अधिकच बिकट होते. २०१२ मध्ये तत्कालीन तहसीलदार अप्पासाहेब शिंदे यांनी काही प्रमाणात रुंदीकरण व गटाराचे काम केले होते; मात्र पुढील काम शेतकऱ्यांच्या विरोधामुळे थांबले.

रम्यान, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर तातडीने मोजणी करून अतिक्रमणे हटवून रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी जोर धरत आहे.



## अजय कुलकर्णी यांना राज्यस्तरीय कलाभूषण पुरस्कार प्रदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा कर्मभूमी असलेले पुणे येथील सोशल वर्कर अजय अंबादास कुलकर्णी यांना श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्थेचा राज्यस्तरीय कलाभूषण पुरस्कार शुक्रवारी नेवासा येथे झालेल्या कार्यक्रमात श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे यांच्या हस्ते व नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.



नेवासा येथील औदुंबर चौकात असलेल्या हॉटेल प्रणामच्या सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे होते तर नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, माजी नायब तहसीलदार चंद्रकांत कांदे, जेष्ठ व्यापारी विजय गांधी, शिवसेना नेते भाऊसाहेब वाघ, बालेंद्र पोतदार, नवोदयचे माजी प्राचार्य अन्सार शेख, किशोर गारुळे उपस्थित होते. यावेळी श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष शांतवन खंडागळे यांनी आलेल्या अतिथींचे स्वागत करून प्रास्ताविक केले. संस्थेने राबविलेल्या वार्षिक उपक्रमाची माहिती त्यांनी दिली.

यावेळी बोलतांना नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी अजय कुलकर्णी यांनी समाजात देत असलेल्या योगदानाचे कौतुक केले उपेक्षित कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देणारे अजय कुलकर्णी यांनी सांस्कृतिक चळवळ निर्माण केली असल्याचे सांगत त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे म्हणाले की, अजय कुलकर्णी यांचे वडील अंबादास कुलकर्णी यांनी नेवासा येथे तहसीलदार असतांना तालुक्याच्या हितासाठी कामे केली.अजय कुलकर्णी यांनी देखील कॉलेज जीवनात अनेक तालुक्यातील कलाकारांना प्रोत्साहित केले आज त्यांना मिळालेला कलाभूषण पुरस्कार ही कौतुकास्पद गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

## महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्त वैजापूरात सार्वजनिक अभिवादन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शिव-फुले-शाहू-आंबेडकर समिती व सर्व थरातील नागरिक बंधू-भगिनी यांच्या वतीने शनिवार (ता.११) रोजी येथील महात्मा फुले पुतळा परिसरात महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रथम वैजापूर -गंगापूर चे आमदार ना. प्रा. रमेश बोरनारे, शहराचे प्रथम नागरिक व नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जिल्हा परिषदेचे व पंचायत समिती सदस्य, पालिका नगरसेवक, विविध संस्थानचे

पदाधिकारी, शिव-फुले-शाहू -आंबेडकर समिती सदस्य, सर्व सामाजिक कार्यकर्ते, महिला, पुरुष यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी वैष्णवी कविता अशोक देवकर या मुलीने महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवन कार्यावर मनोगत व्यक्त केले. देशभक्तीपर व सामाजिक,धार्मिक गीते आपल्या बँड पथकाद्रे चाऊस ब्रास बँड यांनी सादर केली. शिव- फुले -शाहू -आंबेडकर समितीच्या वतीने विविध कार्यक्रम या निमित्ताने सम्पन्न झाले. शहरातील सर्व थरातील नागरिक व महिला, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महात्मा जोतिबा फुले यांना अभिवादन करतांना मान्यवर.

## दुग्ध व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्या : डॉ. बाबासाहेब गुंड

### बाभळेश्वर येथे कृषी विज्ञान केंद्रात दुग्धव्यवसाय प्रशिक्षण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** दुग्ध व्यवसाय हा कष्टाचा असला तरी यामध्ये यांत्रिकीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास तो अधिक नफ्याचा आणि शाश्वत ठरू शकतो, असे प्रतिपादन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बाबासाहेब गुंड यांनी केले. बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्र (पायरेन्स) येथे आयोजित दोन दिवसीय दुग्धव्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे आयोजन जलसंपदा मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, सचिव डॉ. निलेश बनकर आणि प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.




प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी पशुवैद्यकीय तज्ज्ञ डॉ. विठ्ठल विखे यांनी दुग्ध प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि बाजारपेठेतील संधी याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. गुंड यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जनावरांचे संगोपन, संतुलित आहार, रोग प्रतिबंध आणि दुग्ध उत्पादन वाढविण्याच्या उपाययोजनांवर सविस्तर माहिती दिली.

सज्जला लांडगे यांनी दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचे प्रात्यक्षिक सादर करत शेतकऱ्यांनी केवळ दूध विक्रीवर न राहता प्रक्रिया उद्योगाकडे वळण्याचे आणि प्रभावी मार्केटिंग करण्याचे आवाहन केले. डॉ. प्रियंका खर्डे यांनी व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य आणि समूहसंघटन यावर मार्गदर्शन केले.प्रशिक्षणादरम्यान संवादात्मक चर्चासत्रे व शंका निरसन सत्रांमुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली. समारोप प्रसंगी मृदा विभाग प्रमुख शांताराम सोनवणे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून दुग्धव्यवसाय अधिक सक्षम व टिकाऊ करण्याचे आवाहन केले. या प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांमध्ये दुग्धव्यवसायाबाबत नवा दृष्टिकोन निर्माण झाला असून हा व्यवसाय अधिक फायदेशीर ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास नाशिक जिल्ह्यातील ममदापूर (ता. येवला) येथील सुमारे ५० शेतकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. प्रियंका खर्डे यांनी केले.

## जगदंबा यात्रेनिमित्त युवकांची ज्योत यात्रा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा बुद्रुक येथे श्री जगदंबा (भोनाई) यात्रेनिमित्त मंदिर प्रांगणात त्रिदिनात्मक धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या निमित्ताने युवकांच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर ते नेवासा बुद्रुक अशी पायी ज्योत यात्रा काढण्यात आली. ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायाच्या पारायणाने व धर्म ध्वज पूजनाने शुक्रवारी दि.१० एप्रिल रोजी त्रिदिनात्मक धार्मिक सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला.

नेवासा बुद्रुक येथे खळवाडी भागात असलेल्या जगदंबादेवी मंदिराच्या प्रांगणात यात्रेनिमित्त शुक्रवार दिनांक १० एप्रिल ते रविवार दि.१२ एप्रिल या तीन दिवसांच्या कालावधीत त्रिदिनात्मक धार्मिक सोहळा साजरा होत आहे. श्री विश्वेश्वर नाथबाबा, श्री समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबा ,वै. हभप बन्सी महाराज तांबे यांच्या कृपाशिर्वादाने तसेच गुरुवर्य महंत भास्करगिरी महाराज व हभप महंत स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या आशिर्वादाने व महंत उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) व ह.भ.प. वेदांताचार्य देवीदास महाराज म्हस्के यांच्या प्रेरणेने आणि ह.भ.प. विजय महाराज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या त्रिदिनात्मक धार्मिक सोहळयात रात्री कीर्तनाचे कार्यक्रम देखील होणार आहे.

शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी सकाळी ७ ते ८ यावेळेत युवकांच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर ते श्री जगदंबा माता (भोनाई) मंदिर अशी पायी ज्योत यात्रा काढण्यात आली. नेवासा येथे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या हस्ते ज्योतीचे पूजन करण्यात आले.



## पान १ वरुन

### वारकरी संप्रदायात धर्मांध शक्तींची घुसखोरी!

दुसरीकडे वारकरी संप्रदायासारख्या समतेच्या चळवळीतही हे प्रतिगामी लोक घुसखोरी करू लागले आहेत. वारकरी संप्रदायामध्ये ६०% लोक हे बोलताना धर्मांध शक्तींना अधिक बळ मिळेल अशा पद्धतीने मांडणी करतात. म्हणून आता आम्ही यादी करायला सुरुवात केली आहे. आता साधारण चाळीसएक लोक असे दिसतात की ते वारकरी संप्रदायांमध्ये कीर्तन प्रवचन यामधून पुरोगामी भूमिका मांडत असतात. त्यांची अत्यंत गरज आहे. दुर्दैवाने या प्रबोधनाच्या मार्गावर कुठे महिला दिसत नाहीत, अशी खंत शरद पवार यांनी व्यक्त केली आहे.

### अभिजात मराठी आणि स्थानिक बोली यांच्यातील दरी रुंदावतेय...

खानदेशी, मराठवाडी, कोल्हापुरी, पुणेरी, नागपुरी अशा वैविध्यपूर्ण बोली आहेत. पोटबोलींची संख्या तीनशेवर आहे. बोलीभाषेचे इतके वैविध्य देशात इतरत्र कुठेही नाही. दुर्दैवाने, महाराष्ट्रातच बोलींशी असा सावत्र व्यवहार सुरू आहे.

### नांदूरमध्ये तरुणीची गळफास घेत आत्महत्या

मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह खाली उतरवून शवविच्छेदनासाठी श्रीरामपूर येथे पाठवण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, घटनास्थळी कोणतीही 'सुसाईड नोट' सापडलेली नाही. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### .. तर महाराष्ट्रदिनी थेट 'कब्जा आंदोलन'

निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उद्योगमंत्री उदय सामंत, मंत्री पंकजा मुंडे ही समिती घेणार आहे. त्यांच्या बैठकीत जो काही निर्णय होईल तो आपणास कळविण्यात येईल असे पत्र महसूल विभागाचे सचिव सत्यनारायण यांच्या सहीचे पत्र दिले होते. मात्र त्या पत्राचा आमचा काही संबंध नाही. शासन शेतकऱ्यांची चेष्टा करत असून आम्ही त्याचा निषेध करतो आणि त्यांनी या पत्राची होळी केली.या आंदोलनाला आमदार हेमंत ओगले यांनी दूरध्वनीवरून पाठिंबा दर्शविला. तसेच माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, बाळासाहेब बकाल, रूपेश काळे, प्रभाकर कांबळे, विठ्ठलराव शेळके, राजेंद्र पाऊलबुद्धे, सुरेश ताके, निलेश शेंडगे, सुनिता वेताळ, संतोष वाकचौरे यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त केले. नऊ गावांतील महिला-पुरुष शेतकऱ्यांच्या मोठ्या सहभागामुळे आंदोलनाला व्यापक प्रतिसाद मिळाला.आंदोलनाची तीव्रता आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेता, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी रात्री उशिरा दूरध्वनीवरून आंदोलकांशी चर्चा करून या प्रकरणात मध्यस्थी केली आहे. त्यांच्या सूचनेनुसार भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजड, गटनेत्या वैशाली चव्हाण, नगरसेवक दीपक चव्हाण व बंडू शिंदे यांच्या शिष्टमंडळाने आंदोलक शेतकऱ्यांची भेट घेतली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत २३ एप्रिल रोजी मुंबईत विशेष बैठक बोलावण्यात आली असून, या बैठकीसाठी शेतकऱ्यांच्या ५ प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे. या आश्वासनानंतर रात्री साडेआठच्या सुमारास आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# कोपरगावात क्रांतिसूर्य महात्मा फुले यांना अभिवादन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी प्रतिनिधी :** भारतीय समाजव्यवस्थेत समता, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांची मुहूर्तमेढ रोवणारे थोर समाजसुधारक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त कोपरगाव शहरात विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



यावेळी कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, महात्मा फुले यांनी समाजातील शोषित, वंचित व दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला, शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडली तसेच अस्पृश्यता निर्मूलनासाठी धाडसी पावले उचलली. त्यांच्या विचारांमुळेच आधुनिक भारतात सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा मिळाली. महात्मा फुले यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजात बंधुभाव, समता व प्रगती साधणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा नेहमीच पुरोगामी विचारांचा पुरस्कर्ता राहिला असून फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारसरणीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची वाटचाल कोपरगाव मतदार संघात आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असल्याचे राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी अधोरेखित केले.

यावेळी माजी नगरसेवक, गटनेते विरेन बोरावके, डॉ. तुषार गलांडे, राजेंद्र बोरावके, विशाल राऊत, अमोल गिरमे, सतिश भुजबळ, बापूसाहेब इनामके, मयूर बोरावके, नितीन भुजबळ, विजय बागडे, समता उद्योग समुहाचे अध्यक्ष काका कोयटे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, जनार्दन कदम, संदिप कपिले, सोमनाथ आढाव, शैलेश साबळे, राहुल शिरसाठ, बाळासाहेब रुईकर, विजय त्रिभुवन, माजी नगरसेवक कृष्णा आढाव, अनिल बनसोडे आदींसह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### नौशाद बी



**वैजापूर :** राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष माजी उपनगराध्यक्ष अकील सेठ यांच्या पत्नी नौशाद बी (वय ६४ वर्ष) याचे दीर्घ आजाराने शनिवारी (ता.११) दुपारी तीन वाजता दुःखद निधन झाले. कर्करोगाशी झुंज देत उपचारादरम्यान त्यांचे दुःखद निधन झाले. वैजापूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष अकील सेठ यांच्या त्या पत्नी व विद्यमान उपनगराध्यक्ष शेख रियाज यांच्या त्या आई होत.

### संतोष ढेरे



**सोनई :** मूळ निवासी लोहोगाव ता. नेवासा येथील व सोनई येथील अंबिका सायकलचे मालक संतोष अशोक ढेरे (वय -४४) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन बहिणी असा परिवार आहे. ते स्वाती ढेरे यांचे पती,मयूर व उन्नती यांचे वडील,मनीषा गायकवाड, रेणुका कडलक, अनुराधा वारे यांचे ते भाऊ, होत.

# महात्मा फुले जयंतीकडे शासकीय कार्यालयांचे दुर्लक्ष !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यात सामाजिक क्रांतिकारक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात असताना येथील काही महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांमध्ये मात्र या दिवसाकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.




तालुक्यातील पंचायत समिती कार्यालय, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग तसेच उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय येथे ११ एप्रिल रोजी महात्मा फुले जयंतीनिमित्त कोणताही अधिकृत कार्यक्रम, प्रतिमा पूजन किंवा अभिवादन सोहळा आयोजित करण्यात आलेला नसल्याची माहिती समोर आली आहे. दरवर्षी शासनाच्या सूचनांनुसार महापुरुषांच्या जयंतीनिमित्त संबंधित कार्यालयांत त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले जाते. तसेच त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन कर्मचाऱ्यांना प्रेरणा देण्याचा उद्देश असतो.

मात्र यंदा या तिन्ही कार्यालयांत अशा प्रकारचा कोणताही उपक्रम राबविण्यात आला नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. महात्मा फुले यांनी शिक्षण प्रसार, स्त्रीशिक्षण, शेतकरी व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या विचारांचा प्रसार हा शासकीय यंत्रणेचीही जबाबदारी मानली जाते. अशा परिस्थितीत त्यांच्या जयंतीसारख्या महत्त्वाच्या दिवसाकडे दुर्लक्ष होणे ही गंभीर बाब असल्याची प्रतिक्रिया काही सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, ''महापुरुषांच्या जयंती केवळ औपचारिकतेपुरत्या न ठेवता त्यांच्या विचारांचे पालन करणे आवश्यक आहे. परंतु किमान अभिवादन कार्यक्रमही न होणे ही खेदजनक बाब आहे.'' दरम्यान संबंधित कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून याबाबत कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. भविष्यात अशा घटना टाळून शासनाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# भोकरमध्ये भरला प्रशासनाचा 'लोकदरबार' समाधान शिबिरात २५८ लाभार्थ्यांना लाभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील भोकर येथील श्री. चक्रपाणी महानुभव आश्रम येथे गुरुवारी (दि. ०९) सायंकाळी ०६. ०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत २५८ लाभार्थ्यांना थेट सेवा देण्यात आली.

शिबिरास महानुभाव पंथाचे विकासपुरुष कवीश्र्वर कुळाचार्य श्रीकारंजेकर बाबाजी, अपर जिल्हाधिकारी शिर्डी बाळासाहेब कोळेकर, अपर जिल्हाधिकारी नगर शैलेश हिंगे तसेच गोदावरी खोरे सहकारी दुध उत्पादक संघाचे चेअरमन राजेश आबा परजणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरात उत्पन्न व भूमिहीन दाखले, संजय गांधी योजना लाभ, आधार अद्ययावत, रेशनकार्ड, आयुष्यमान कार्ड तसेच जिल्हा परिषद सेस योजनेअंतर्गत विविध सेवा देण्यात आल्या. याशिवाय ६२ नागरिकांची आरोग्य तपासणी करून बी.पी., शुगर व हिमोग्लोबिन चाचण्या करण्यात आल्या तसेच आवश्यक औषधोपचारही देण्यात आले.

प्रांताधिकारी किरण सावंत पाटील व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली संगायो नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, पुरवठा निरीक्षक राजेंद्र शिंदे, प्र. निवासी नायब तहसीलदार अभया राजवाळ यांच्यासह महसूल व संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेत शिबीर यशस्वी केले.




# २१ एप्रिलपासून महसूल कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप;

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** वर्षानुवर्षे प्रलंबित मागण्यांकडे शासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी २१ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनात सर्वांनी एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा संघटनेच्या वतीने करण्यात आले. शुक्रवारी (दि. १०) श्रीरामपूर तहसील कार्यालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष उमेश डावखर, श्री. पेद्राम तसेच सरचिटणीस सुभाष तळेकर यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना संपाची भूमिका व पुढील दिशा स्पष्ट केली. सरकारच्या असंवेदनशील भूमिकेवर टीका करत, अभी नही तो कभी नही या भूमिकेतून हक्कासाठी लढण्याची वेळ आल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले. मागण्यांबाबत ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. बैठकीला श्रीरामपूर तालुक्यातील महसूल विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. २१ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या या बेमुदत संपामुळे शासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत असून, कर्मचारी मात्र आपल्या मागण्यांवर ठाम असल्याचे चित्र दिसून आले.

**'या' आहेत प्रमुख मागण्या**

- सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अधिसूचना तात्काळ जारी करावी
- १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी
- चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवावी
- कंत्राटी व रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित कराव्यात
- सर्वांसाठी व्यापक आरोग्य विमा योजना लागू करावी
- सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे

# झापवाडी शाळेत गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव** - नेवासा तालुक्यातील झापवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव सत्कार सोहळा शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ माजी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य तसेच सोसायटीचे अध्यक्ष, सर्व सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते संजय वाघ हे होते तर व्यासपीठावर महाराष्ट्र शासन आरोग्य औद्योगिक व सुरक्षा विभागाचे सहाय्यक संचालक प्रल्हाद झरेकर तसेच जलसंपदा विभागाचे सहाय्यक अभियंता संदीप जरे, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सुनील जरे या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते शाळेचे विद्यार्थी कुमार कृष्णा झरेकर, रुद्रा जरे कुमारी तृप्ती जरे , सानवी ठाणगे, स्वरा बऱ्हाटे, पुनम वाघ तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सुषमा गायकवाड व शिक्षक यशवंत गवळी, शुभांगी सातपुते, निर्मला ढेरे, योगिता धाडगे, प्रतिभा धामणे या शिक्षकांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ वाळके यांनी केले





# गंगापूर कर्मचारी वसाहतीत बेकायदा बांधकामाबाबत तक्रार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर ;** नगर परिषद कर्मचारी वसाहत परिसरात सुरू असलेल्या कथित बेकायदा धार्मिक हॉलच्या बांधकामाविरोधात रहिवाशांनी गंगापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या अर्जात म्हटले आहे की संबंधित बांधकाम तात्काळ थांबविण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारदारांनी नमूद केले आहे की, ते गेल्या २० वर्षांपासून सदर परिसरात शांततेत वास्तव्यास असून विविध जाती-धर्माचे नागरिक येथे एकोप्याने राहत आहेत. परिसरात आधीपासूनच एक समाज मंदिर असून याशिवाय अन्य कोणतेही धार्मिक स्थळ उभारण्यात आलेले नाही. मात्र, नगर परिषदेचे निवृत्त कर्मचारी यांनी त्यांच्या मालकीच्या प्लॉटवर प्रार्थना हॉलचे बांधकाम सुरू केल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिसरात त्या समाजाचे नागरिक वास्तव्यास नसताना हे बांधकाम केवळ सामाजिक तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने होत असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. तसेच, हे बांधकाम बेकायदेशीर असल्याचे सांगत ते तात्काळ थांबविण्याची मागणी करण्यात आली असून, अन्यथा परिसरातील शांतता व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा इशाराही देण्यात आला आहे.संबंधित बांधकाम पाडून टाकावे व भविष्यात अशा प्रकारची उभारणी होऊ नये, यासाठी प्रशासनाने लक्ष घ्यावे, अशी मागणी तक्रार अर्जात करण्यात आली आहे. निवेदनावर ॲड. रविराज दारुंटे,राहुल खाजेकर, किरण खाजेकर, जुनेद शेख, देविदास शिंदे, प्रवीण खाजेकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शालेय जीवन, खेळ आणि ऑलम्पिक स्वप्न यशाचा खरा पाया इथेच घडतो!

भारतासारख्या तरुण देशात क्रीडा क्षेत्राची अपार क्षमता असूनही आपण जागतिक स्तरावर अपेक्षित यश मिळवताना अनेकदा मागे पडतो. यामागे केवळ सुविधा किंवा संसाधनांचा अभाव कारणीभूत नाही, तर आपल्या विचारसरणीमध्ये असलेली एक मोठी उणीवही तेवढीच जबाबदार आहे. आपण खेळाकडे अजूनही 'मनोरंजन' म्हणून पाहतो, 'भविष्य घडवणारे माध्यम' म्हणून नाही. विशेषतः शालेय जीवनात ही गोष्ट अधिक ठळकपणे जाणवते. विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सहावी आणि सातवीचा काळ हा अत्यंत महत्त्वाचा असतो. या वयात मुलांची शारीरिक क्षमता वाढत असते, त्यांची ऊर्जा उच्च पातळीवर असते आणि नवीन गोष्टी शिकण्याची तयारीही प्रचंड असते. जेव्हा एखादा विद्यार्थी या वयात एखाद्या खेळाचा नियमित सराव सुरू करतो, तेव्हा केवळ त्याचे कौशल्यच विकसित होत नाही, तर त्याच्या व्यक्तिमत्त्वातही सकारात्मक बदल घडू लागतात. शिस्त, आत्मविश्वास, सहकार्यभाव, नेतृत्वगुण आणि जिद्द यांसारख्या मूल्यांची पायाभरणी याच काळात होते. दोन वर्षांच्या सातत्यपूर्ण सरावानंतर हा विद्यार्थी चांगला खेळाडू बनण्याच्या मार्गावर येतो आणि त्याच्या मनात मोठी स्वप्ने आकार घेऊ लागतात. परंतु हीच प्रगती आठवी, नववी आणि दहावी या टप्प्यावर येऊन अचानक थांबते. या वयात विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा ताण प्रचंड वाढतो. बोर्ड परीक्षांचे महत्त्व, जास्त गुण मिळवण्याची स्पर्धा आणि भविष्यातील करिअरची चिंता या सगळ्यांमुळे खेळ दुय्यम ठरतो. पालक आणि शिक्षकांच्या मनातही एक ठाम समज असतो की, या महत्त्वाच्या वर्षांमध्ये खेळापेक्षा अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना थेट किंवा अप्रत्यक्षपणे खेळापासून दूर राहण्यास सांगितले जाते. क्लासेस, टेस्ट्स आणि होमवर्क यांच्या ओझ्याखाली त्यांचा सराव कमी होत जातो आणि शेवटी पूर्णपणे थांबतो. खेळामध्ये सातत्य हे अत्यंत आवश्यक असते. जे विद्यार्थी सहावी-सातवीत चांगल्या स्तरावर पोहोचतात, ते जर पुढील तीन वर्षे खेळापासून दूर राहिले, तर त्यांच्या कौशल्यावर आणि फिटनेसवर त्याचा मोठा परिणाम होतो. शरीराची लय तुटते, सरावाची सवय कमी होते आणि आत्मविश्वासही ढासळतो. दहावी नंतर जेव्हा ते पुन्हा खेळाकडे वळण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्यांना जाणवते की त्यांनी खूप काही गमावले आहे. त्या स्तरावर परत पोहोचण्यासाठी त्यांना पुन्हा सुरुवातीपासून मेहनत घ्यावी लागते, आणि अनेक वेळा ते शक्यही होत नाही. ऑलम्पिकमध्ये पदक जिंकणे हे कोणत्याही देशासाठी अभिमानाची बाब असते, परंतु त्या यशामागे अनेक वर्षांची सातत्यपूर्ण मेहनत आणि योग्य नियोजन असते. एक उत्कृष्ट खेळाडू तयार होण्यासाठी लहानपणापासूनच त्याला योग्य प्रशिक्षण, पोषण, मानसिक तयारी आणि प्रोत्साहन मिळणे आवश्यक असते. जर शालेय जीवनातच खेळाला दुय्यम स्थान दिले गेले, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकणारे खेळाडू निर्माण होणे कठीण होते. त्यामुळे ऑलम्पिक पदकाचे स्वप्न साकार करण्यासाठी शालेय स्तरावरच खेळाचा मजबूत पाया घालणे गरजेचे आहे.या संपूर्ण प्रक्रियेत पालक आणि शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील निर्णयांवर त्यांचा मोठा प्रभाव असतो. त्यांनी केवळ गुण आणि परीक्षांपुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी ओळखून त्यांना योग्य दिशेने प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थी डॉक्टर किंवा इंजिनिअरच होईल असे नाही, आणि तसं होणं आवश्यकही नाही. क्रीडा क्षेत्रातही मोठ्या संधी उपलब्ध आहेत, आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी या क्षेत्रात उज्ज्वल भविष्य घडवू शकतात. खेळाचा फायदा केवळ पदकांपुरता मर्यादित नसतो. तो विद्यार्थ्यांना आयुष्यभर उपयोगी पडणारे अनेक गुण देतो. शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्थैर्य, निर्णयक्षमता, वेळेचे व्यवस्थापन आणि अपयशाचा सामना करण्याची ताकद हे गुण खेळातूनच विकसित होतात. त्यामुळे खेळ हा शिक्षणाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारणे अत्यावश्यक आहे. आजची खरी गरज आहे ती आपल्या विचारसरणीत बदल घडवण्याची. शिक्षण आणि क्रीडा यांना एकमेकांच्या विरोधात न पाहता, एकमेकांना पूरक म्हणून पाहिले पाहिजे. शाळांनी क्रीडा सुविधांमध्ये वाढ करावी, स्पर्धांचे आयोजन करावे आणि विद्यार्थ्यांना खेळासाठी प्रोत्साहित करावे. पालकांनीही मुलांवर अनावश्यक शैक्षणिक दडपण न आणता त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष द्यावे. शेवटी एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात घ्यावी लागेल की, शालेय जीवनात खेळाला दिलेले महत्त्वच भविष्यातील यश निश्चित करते. जर मुलांनी लहानपणापासून सातत्याने खेळ खेळला, त्यात प्रामाणिकपणे मेहनत घेतली, तरच ते मोठ्या पातळीवर देशाचे नाव उज्ज्वल करू शकतात.शालेय जीवनात खेळलेली प्रत्येक क्षण, प्रत्येक सराव आणि प्रत्येक घामाचा थेंब हा भविष्यातील ऑलम्पिक पदकाचा खरा पाया असतो.



**श्री गौरव अरविंद डेंगळे**
FIVB Level १ व्हॉलीबॉल
**प्रशिक्षक.**
८७९३३२१५१५

## नशिबाची परिक्षा

**रविवार दि .१२ एप्रिल २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १९० २३० २४४ | ०-१ | १२८ १४६ १०० | जोड ०७-६१-२३ ८४-१९ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० ४९० ६७० | ३-८ | १२५ २६० ४४० | जोड ३१-६८-२९ ४०-८५ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२६ ४५० १४४ | ९-२ | १५६ २४६ २२८ | जोड ९०-४२-१५ ८७-२६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | (2 3 9) 42 (1 4 7) | (4 6 9) 92 (1 3 8) | (1 3 0) 43 (3 0 0) | (8 8 9) 57 (1 7 9) | (1 1 0) 22 (4 8 0) |
| 12/01/2026 to 16/01/2026 | (4 9 0) 33 (1 4 8) | (1 9 0) 09 (1 2 6) | (4 7 9) 08 (4 6 8) | (1 1 6) 84 (7 7 0) | (3 5 8) 62 (1 4 7) |
| 19/01/2026 to 23/01/2026 | (1 4 8) 35 (2 5 8) | (1 2 5) 86 (1 6 9) | (3 3 6) 20 (1 3 6) | (1 9 9) 96 (3 3 0) | (2 5 8) 59 (5 5 9) |
| 26/01/2026 to 30/01/2026 | (* * *) ** (* * *) | (1 2 0) 30 (1 1 8) | (6 7 9) 23 (3 4 6) | (1 3 4) 83 (2 4 7) | (2 4 9) 52 (1 3 8) |
| 02/02/2026 to 06/02/2026 | (1 2 9) 28 (1 7 0) | (2 4 9) 55 (7 8 0) | (5 7 0) 20 (6 7 7) | (3 7 7) 73 (2 4 7) | (1 3 4) 87 (4 5 8) |
| 09/02/2026 to 13/02/2026 | (3 7 8) 82 (7 7 8) | (1 2 6) 93 (1 5 7) | (6 7 9) 22 (5 7 0) | (1 3 9) 34 (4 0 0) | (6 8 9) 30 (1 4 5) |
| 16/02/2026 to 20/02/2026 | (3 4 7) 46 (3 5 8) | (1 5 6) 29 (5 6 8) | (7 7 9) 38 (2 3 3) | (1 2 6) 92 (2 4 6) | (1 2 3) 65 (4 5 6) |
| 23/02/2026 to 27/02/2026 | (2 5 0) 76 (4 5 7) | (2 2 9) 39 (4 6 9) | (2 6 6) 48 (1 7 0) | (1 6 8) 53 (5 8 0) | (1 4 5) 09 (5 6 8) |
| 02/03/2026 to 06/03/2026 | (1 3 0) 47 (2 6 9) | (2 4 4) 03 (2 4 7) | (* * *) ** (* * *) | (2 5 7) 48 (2 7 9) | (4 6 6) 65 (2 4 9) |
| 09/03/2026 to 13/03/2026 | (2 3 6) 16 (2 4 0) | (1 6 8) 56 (8 8 0) | (5 7 8) 05 (8 8 9) | (2 4 8) 43 (1 4 8) | (3 3 4) 09 (1 3 5) |
| 16/03/2026 to 20/03/2026 | (4 5 6) 56 (8 9 9) | (2 0 0) 21 (3 8 0) | (4 6 0) 02 (4 9 9) | (1 2 7) 02 (1 3 8) | (6 7 0) 38 (3 7 8) |
| 23/03/2026 to 27/03/2026 | (6 8 9) 34 (3 5 6) | (4 5 5) 46 (1 7 8) | (5 6 9) 03 (7 8 8) | (1 3 0) 46 (2 4 0) | (3 3 0) 64 (1 6 7) |
| 30/03/2026 to 03/04/2026 | (2 8 9) 90 (1 3 6) | (1 3 4) 87 (1 6 0) | (2 7 0) 97 (2 7 8) | (1 1 9) 12 (1 5 6) | (1 6 9) 66 (2 5 9) |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# द•ख•ल

## शितल थोरात यांची न्यायाधीशपदी निवड

**श्रीगोंदा** : मातीचा सुगंध अंगात, डोळ्यांत मोठं स्वप्न आणि जिद्दीच्या जोरावर थेट न्यायासनावर झेप! श्रीगोंदा तालुक्यातील हंगेवाडी येथील शितल नानासाहेब थोरात यांनी न्यायाधीशपदाची निवड मिळवत तालुक्याचा मान उंचावला आहे.



शितल यांचे प्राथमिक शिक्षण हंगेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले, तर माध्यमिक शिक्षण हंगेश्वर माध्यमिक विद्यालयात पूर्ण झाले. पुढील उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील नामांकित फर्ग्युसन कॉलेज येथे शिक्षण घेत आपली शैक्षणिक वाटचाल सक्षमपणे पूर्ण केली.शेतकरी कुटुंबातील मुलगी असलेल्या शितल यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हा यशाचा टप्पा गाठला. श्रीगोंदा तालुक्यातून न्यायाधीशपदी निवड होणाऱ्या त्या पहिल्या युवती ठरल्या आहेत.या यशामागे त्यांना कुटुंबाचा भक्कम आधार लाभला. मामा न्यायाधीश दादासाहेब गोपीनाथ मस्के, प्रा. कृष्णा गोपीनाथ मस्के तसेच चुलते सुभाष किसन थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. वडील नानासाहेब थोरात हे किराणा व्यवसाय करत असून, त्यांनी मुलीच्या शिक्षणासाठी सातत्याने पाठबळ दिले.जिद्द असेल तर वाट नक्की सापडते, हे शितल यांच्या यशातून पुन्हा अधोरेखित झाले. गावाकडच्या मुलींनाही मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्याचा आत्मविश्वास देणारी ही कहाणी ठरली आहे.शेतकर्यांच्या शेतातून निघालेली वाट आता थेट न्यायाच्या दरबारात पोहोचली आणि श्रीगोंद्याचा झेंडा पुन्हा एकदा उंच फडकला! आहे, असे जन्मानसातून बोलले जात आहे.

## श्रीगोंदा वकील संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष शिंदे यांनी स्वीकारला पदभार

**लिंपणगाव** : श्रीगोंदा वकील संघाची दि. ०१/०४/२०२६ रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडली सदर निवडणुकीमध्ये अध्यक्षपदी ॲड. जयंत शिंदे, उपाध्यक्षपदी ॲड.संपत इधाटे, महिला उपाध्यक्षपदी रवीं.विजया जाधव /घोडके, सचिव पदी रवीं.संदीप सातपुते, महिला सचिव/ ग्रंथपाल पदी रवीं. सविता आसवले, तसेच खजिनदारपदी रवीं.राजन नहार यांची निवड झाली.

त्यानंतर दिनांक ०९/०४/२०२६ रोजी श्रीगोंदा वकील संघाची सभा आयोजित करण्यात आलेली होती सदर सभेमध्ये श्रीगोंदा वकील संघाचे माजी अध्यक्ष रवीं. प्रसाद इंगळे व त्यांचे पदाधिकारी यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा श्रीगोंदा वकील संघा तर्फे निवडून आल्याबद्दल सत्कार केला तसेच श्रीगोंदा वकील संघाच्या सन २०२६-२७ या कार्यकाळाची सूत्रे नवनिर्वाचित अध्यक्ष रवीं. जयंत शिंदे व नवनिर्वाचित पदाधिकारी यांच्याकडे सोपवली. वीं. शिंदे यांनी वकील संघाचे अध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.

त्यावेळी श्रीगोंदा वकील संघाचे सर्व ज्येष्ठ व कनिष्ठ तसेच महिला विधीज्ञ हजर होते सर्व वकील बांधवांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## सत्यशोधक विचारांनी समाजपरिवर्तनाची मशाल हाती घ्यावी : गणेश राऊत

**अहिल्यानगर** : क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त सावेडी उपनगरात वंचित बहुजन आघाडी प्रणित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार युवा मंचाच्या वतीने गुलमोहोर रोड चौक येथे वैचारिक अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी सामाजिक समतेचा संदेश देत विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महात्मा फुले यांनी दिलेला समतेचा विचार हा केवळ तत्त्वज्ञान नसून शोषित-वंचितांच्या मुक्तीचा मार्ग आहे. आजच्या काळात फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांना आचरणात आणणे, हाच खरा उत्सव आहे,असे ते म्हणाले. समाजातील विषमता दूर करण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.यावेळी युवा मंचाच्या वतीने सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. पारंपारिक सण साजरे करण्यापेक्षा समाजात प्रबोधनाची जागृती करणे ही काळाची गरज असल्याचे मतही उपस्थितांनी व्यक्त केले. आम्ही केवळ जयंती साजरी करत नाही, तर अज्ञानाविरुद्ध लढा उभारतो, असा निर्धार युवा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## महात्मा फुले जयंती उत्साहात

**अहिल्यानगर** : सारसनगर येथील दामोदर विधाते मास्तर विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये महात्मा फुले यांच्या कार्याचा, विचारांचा व समाजप्रबोधनाच्या संदेशाचा जागर करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. नगरसेवक प्रकाश भागानगरे यांच्या हस्ते हा पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक ज्ञानदेव पांडुळे, अभिषेक चिपाडे, अवधूत फुलसौंदर, संस्थेचे सरचिटणीस प्रा. शिवाजीराव विधाते, मयूर विधाते, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शिवाजीराव म्हस्के, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष सुसे तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरसेवक प्रकाश भागानगरे म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्ध लढा देत शिक्षणाची क्रांती घडवून आणली.

# सिस-पे समर्थ घोटाळा : कोट्यवधींची लूट

## जनता वाऱ्यावर; दलाल फरार! जामिनावर संचालक, पोलिसांना सापडेनात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यात सिस-पे व समर्थक्रॉप या गोंडस नावाखाली सुरू असलेल्या आर्थिक व्यवहारातून मोठा घोटाळा उघडकीस येत असून, सर्वसामान्य जनतेची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. जास्त परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांना जाळ्यात ओढणाऱ्या या योजनेमुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.

प्रकरणी अनेक तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या असून काही एजंट व दलालांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. काही आरोपी सध्या फरार असून काहींनी जामीन मिळवला आहे. मात्र, मुख्य सूत्रधार असलेल्या कंपनीचे संचालक अद्याप पोलिसांच्या हाती लागले नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.दरम्यान, या घोटाळ्यात सहभागी असलेल्या दलालांच्या मालमत्तांवर आर्थिक गुन्हे शाखेकडून टाच आणण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यांच्या बँक खात्यांची चौकशी केली जात आहे. चेक बाऊन्ससह इतर आर्थिक गुन्ह्यांबाबतही नव्याने गुन्हे दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांकडून दलालांकडे पैशांसाठी तगादा लावला जात आहे. मात्र, जीवे मारले तरी पैसे नाहीत अशी उडवाउडवीची उत्तरे देत काही एजंट पळ काढत असल्याचे समोर आले आहे. अनेक एजंट तर कुटुंबीयांना सोडून फरार झाले आहेत.या प्रकारामुळे अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर आले असून, काहींवर उपासमारीची वेळ आली आहे. जास्त नफ्याच्या मागे धावताना मूळ भांडवलच गमावलं तालुक्यातील अनेकांची वेदना आता उघड्यावर आली आहे.जलद आणि मोठा नफा

### खाजगी शिक्षण संस्थेतील शिक्षक फरार

सिस पे मध्ये जास्त अमिषाच्या नावाखाली जास्त पैसे कमविण्यासाठी तालुक्यातील एका खाजगी शिक्षण संस्थेतील शिक्षकाने जास्त नफा मिळविण्यासाठी कडवी झुंज दिली मात्र गेल्या एक वर्षापासून तो फरार आहे त्याचा गुंतवणूकदार आणि पोलीसही शोध घेत असल्याची माहिती मिळत आहे.

या आमिषाने सामान्य नागरिकांना जाळ्यात ओढणाऱ्या अशा योजनांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# नवीन रस्त्यांवर गॅस पाईपलाईन कंपनीकडून खोदकाम; नागरिकांमध्ये संताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शहरातून जाणाऱ्या मनमाड राज्य महामार्गाचे डांबरीकरण व रुंदीकरणाचे काम नुकतेच पूर्ण झाले असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने शहराला सुशोभीकरणाचे रूप प्राप्त झाले होते. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला होता.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून या कामासाठी शासनाकडून मोठा निधी उपलब्ध झाला होता. मात्र, नव्याने तयार झालेल्या रस्त्यावर गॅस पाईपलाईन कंपनीकडून ठिकठिकाणी खोदकाम करण्यात येत असून मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे नव्या रस्त्यांची पुन्हा दुरवस्था होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या संपूर्ण प्रकाराकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने अक्षरशः डोळेझाक केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शहरात प्रशासन आहे की नाही? असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत. नव्याने झालेल्या रस्त्यांवर अशा प्रकारे खोदकाम होणे ही गंभीर बाब असून, यामुळे अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता आहे.

गॅस पाईपलाईन कंपनीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरात सुरू असले रस्ता काँक्रिटीकरणाचे कामे भविष्यात गॅस पाईपलाईन कंपनीकडून खोदली जाऊ शकतात यासाठी.

महापालिकेने नव्याने तयार झालेल्या रस्त्यांचे संरक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. तसेच गॅस पाईपलाईनसारखी कामे नियोजनबद्ध पद्धतीने करून नागरिकांना त्रास होणार नाही, याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. अन्यथा अशा प्रकारे नव्या रस्त्यांवर पुन्हा पुन्हा खड्डे खोदले जाणार असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# शिर्के कंपनीकडून ज्ञानमंदिरासाठी आर्थिक मदतीचे कोटीचे उड्डाण

## सरस्वती विद्यालयास इमारत बांधकामासाठी भरीव मदत



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**देवदैठण** : श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या सरस्वती विद्यालयास नविन इमारत बांधकामासाठी बी.जी. शिर्के कंपनीकडून कोटीचे उड्डाण घेताना तब्बल एक कोटी रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

यापूर्वीही बी.जी. शिर्के कंपनीने याच विद्यालयात विद्यार्थिनींसाठी अद्यावत सुसज्ज स्वच्छतागृह बांधून देऊन होणारी गैरसोय दूर केली आहे. सध्या विद्यालयात विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता नविन व प्रशस्त इमारतीची आवश्यकता भासत होती. ही गरज ओळखून बी.जी. शिर्के कंपनीने आपल्या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पुढाकार घेत ही मोठी आर्थिक मदत दिली आहे. या निधीतून सुसज्ज वर्गखोल्या, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय तसेच इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये आमूलाग्र बदल होणार असून विद्यार्थ्यांना आधुनिक व दर्जेदार शिक्षणाचे वातावरण उपलब्ध होणार आहे.

यानिमित्ताने शिक्षण क्षेत्रात केलेले हे योगदान भविष्यातील पिढी घडवण्यासाठी मोलाचे ठरेल अशा भावना व्यक्त करत नुकताच ग्रामस्थ व विद्यालयाचे माजी विद्यार्थी यांच्या वतीने कंपनीचे उपाध्यक्ष आर. बी. सूर्यवंशी, सहाय्यक संचालक नंदकिशोर कुदळे यांचा आभार पत्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य कुंडलिकराव सानप, निवृत्त पोलीस उपधीक्षक नंदकिशोर इथापे, अमोल यादव, मयुरी यादव तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी विश्वनाथ भोसले, ॲड. वासंती इथापे, विलास सकट, अशोक भोसले आदी उपस्थित होते.

# महात्मा फुलेंचे विचार क्रांतीकारक : सचिन झगडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात राष्ट्रपिता जोतीराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.मनोगतामध्ये अहिल्यानगर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी महात्मा फुले यांचे जीवन कार्याचा आढावा घेत असताना आज जीवनातून धार्मिक, मानसिक गुलामगिरीतून बाहेर पडले पाहिजे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करून जीवनामध्ये प्रगती केली पाहिजे महापुरुषांच्या विचार अंगिकारले पाहिजे असे विचार व्यक्त केले.

महात्मा फुले जयंती व मुलगा शिवराज यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कुलदीप निंबाळकर व सुशिला निंबाळकर यांनी विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना १५ हजार रुपये किमतीचे शालेय स्कूल बॅग वितरण करण्यात आले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ यांनी निंबाळकर कुटुंबाचे ऋण व्यक्त केले. श्री व सौ निंबाळकर यांचा सन्मान विद्यालयाचे पर्यवेक्षिका सुनिता काकडे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे कलाशिक्षक शरद शिरसाट, सूत्रसंचालन सुधीर साबळे, तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य शहाजी एकाड यांनी केले.

# फुलेंच्या स्मारकाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे : किरण काळे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या दांपत्याने देशामध्ये शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. या सगळ्याचा ऐतिहासिक संदर्भ अहिल्यानगर शहराशी जोडला गेलेला आहे. मात्र गेल्या अनेक दशकांपासून शहरांमध्ये फुलेंच भव्य दिव्य स्मारक उभ राहू शकल नाही ही खंत आहे. स्मारक उभारण्याच काम अहिल्यानगर महानगरपालिकेने लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

फुले यांच्या जयंतीनिमित्त माळीवाडा येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काळे बोलत होते. यावेळी संजय झिंजे, मनोज गुंदेचा, अनिस चुडीवाला, विलास उबाळे, रावजी नांगरे, दीपक भोसले, संजय गारुडकर सर, राम वाणी, राम झिने, अलतमश जरीवाला, रोहन शेलार, चंद्रकांत उजागरे, संतोष घरवाढवे, मतीन शेख, उषाताई भगत, शैलाताई लांडे, शंकर आव्हाड, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, गणेश आपरे, अमोल खाडे, रामभाऊ धोत्रे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

काळे म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील रूढी, परंपरा यांना छेद देत समाजामध्ये बदल रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांना मोठ्या संघर्षाला तोंड द्यावे लागले. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये महात्मा फुले यांनी केलेले क्रांतिकारी कामामुळे समाजाची दिशा बदलून गेली. महात्मा ज्योतिबा फुले यांना सावित्रीमाईंची मिळालेली साथ अत्यंत महत्त्वपूर्ण होती. फातिमा शेख यांचा देखील या चळवळीतील सहभाग हा अत्यंत मोलाचा आहे.

## अहिल्यानगर शहरातील एमजी रोड कापड बाजारात

# ‘पे अँड पार्क’ला व्यापाऱ्यांचा तीव्र विरोध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत शहरातील १२ रस्त्यांवर ‘पे अँड पार्क’ तसेच १२ रस्त्यांवर ‘नो पार्किंग’ योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. या योजनेत एमजी रोड कापड बाजार या महत्त्वाच्या व्यापारी भागाचा समावेश करण्यात आल्याने येथील व्यापाऱ्यांनी तीव्र हरकत नोंदवली आहे.

एमजी रोड कापड बाजारातील व्यापाऱ्यांनी यापूर्वी रस्ता रुंदीकरणासाठी दोन्ही बाजूंनी सुमारे सात ते आठ फूट जागा कोणतीही नुकसानभरपाई न घेता स्वतःच्या खर्चाने इमारती तोडून दिल्याचे सांगितले. या संदर्भात शासन व महापालिकेमध्ये तडजोड झालेली असताना ‘पे अँड पार्क’ लागू करणे हे अन्यायकारक असून न्यायालयाचा अवमान ठरू शकतो, असे व्यापाऱ्यांचे मत आहे.

या बाजारपेठेत किरकोळ स्वरूपातील दुकाने असून अगदी पाच रुपयांपासून वस्तू विकल्या जातात. अशा ठिकाणी पार्किंग शुल्क आकारल्यास ग्राहक येणे कमी होईल व व्यवसायावर मोठा परिणाम होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. परिणामी बाजारपेठ इतर ठिकाणी स्थलांतरित होण्याची शक्यता असून अनेक कामगारांच्या नोकऱ्यांवरही गदा येऊ शकते.

महापालिकेने हरकती व सूचना मागवण्यापूर्वीच खाजगी कंत्राटदाराला पत्र देऊन प्रक्रिया सुरू केल्याचा आरोपही व्यापाऱ्यांनी केला आहे. ही कृती पक्षपाती व बेकायदेशीर असून नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना बाधा आणणारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

शहरात अद्याप योग्य पार्किंगची व्यवस्था नसताना अचानक ‘पे अँड पार्क’ योजना राबवणे हे अव्यवहार्य व नियोजनशून्य असल्याची टीका करण्यात आली. तसेच एमजी रोड कापड बाजार हा शासन निर्णयानुसार ‘नो हॉकर्स झोन’ असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याकडेही लक्ष वेधण्यात आले.

योजनेत चारचाकी वाहनांच्या पार्किंगचा समावेश असल्याने रस्त्यावर वाहतूक कोंडी वाढण्याची शक्यता आहे. तसेच वाहन टोइंग केल्यास मोठा दंड व जीएसटी आकारला जाणार असल्याने सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

शहरातील नागरिक व नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांनी या मागणीला पाठिंबा द्यावा, तसेच एमजी रोड कापड बाजाराचा ‘पे अँड पार्क’ योजनेतून तात्काळ वगळावा, अशी मागणी व्यापारी संघटनेने केली आहे.

या पत्रकार परिषदेस शामराव देडगावकर, ईश्वर बोरा, किरण व्होरा, कमलेश आहूजा, संभव काठेड, विशाख वैद्य, रुपेश नहाटा, राहुल मुथा, प्रकाश बायड, भागचंद रामसिंगानी आदी उपस्थित होते.

# मळगंगा देवीच्या घागर मिरवणुकीसाठी लाखोंची गर्दी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या घागरीच्या दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने भावीकांनी गर्दी केली होती. शुक्रवारी रात्री साधारण ११ वाजता देवीच्या हेमांडपंथी बारवेत श्रींचे दर्शन झाले. त्यानंतर मध्यरात्री मानकऱ्यांच्या हस्ते या घागरीची महापूजा करण्यात आली. त्यानंतर सकाळी ७ वाजता या घागरीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भावीकांनी माता मळगंगा देवीच्या जयजयकाराच्या घोषना देत आसमंत दणाणून सोडला. यावेळी हेमांडपंथी बारव ते मंदिर आणी पुन्हा हेमांडपंथी बारवेत या घागरीचे विसर्जन करण्यात आले. यावेळी मिरवणूक सुरू असताना ठिकठिकाणी भावीकांनी घागरीवर पुष्पवृष्टी केला. तसेच मळगंगा मंदीर व ग्रामपंचायत चौकात घागरीवर ड्रोनच्या माध्यमातून घागर व मिरवणूक यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच यावेळी घागर मिरवणूक मंदीराजवळ आल्यानंतर पुजारी म्हणून मान असलेल्या गायखे कुटुंबाती सवाष्णींने घागरीचे औषन केले. यावेळी भावीक भक्तांनी मळगंगा देवीच्या घोषना देत जयजयकार केला. फक्त ३०० मीटर अंतर असलेल्या या मिरवणुकीला दोन तास लागले. शनिवार दि. ११ रोजी देवी दर्शनासाठी मोठ्या रांगा लागल्या होत्या.

दुपारी चार वाजता छबिण्याची मिरवणूक काढण्यात आली ही मिरवणूक कुंडावर गेल्यानंतर तेथील यात्रा सुरू झाली. ही काठी शिखराला लागल्यानंतर कुंडाची यात्रा सुरू होत असते दोन दिवस ही यात्रा सुरू असते या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी खेळणे साहित्य, मिठाईची दुकाने, पाळणे, तसेच शेती साहित्य मोठ्या प्रमाणात या यात्रेत मिळत असते. महिला भगीनी मोठ्या प्रमाणात खरेदी करुन या यात्रेचा आनंद घेतात. रविवार दि.१२ रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत मोठ्या प्रमाणात कुस्ती हगाम्याचे आयोजन करण्यात आले आहे. या हगाम्याने या यात्रेची सांगता होत असते. रात्री गावामध्ये किरणकुमार ढवळपुरीकर यांच्या लोकनाट्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार दि.१३ रोजी शहाकादरी बाबांचा उरुस होणार असून मंगळवारी दि.१४ रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मृती संघ निघोज व मुंबई यांनी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# द • ख • ल

## डिंग्रजवाडीत युवकाची गळफास घेऊन आत्महत्या



**तळेगाव ढमढेरे :** डिंग्रजवाडी (ता. शिरूर) येथील प्रवीण गव्हाणे हा दुपारच्या सुमारास घरात असताना काही वेळाने प्रवीणची चुलत आजी सुगंधा गव्हाणे या घरामध्ये गेल्या असता त्यांना प्रवीण याने गळफास घेतल्याचे दिसून आले, दरम्यान नागरिकांनी प्रवीण याला खाली घेत रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी प्रवीण गणपत गव्हाणे (वय ३० वर्षे रा. डिंग्रजवाडी ता. शिरुर जि. पुणे) याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले, घडलेल्या प्रकाराबाबत अमोल तीरसिंग गव्हाणे (वय ३७ वर्षे रा. डिंग्रजवाडी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार गणेश कुदळे हे करत आहे.

## अन्नापूर येथे एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**तळेगाव ढमढेरे :** अन्नापूर (ता. शिरूर) येथील शब्बीर शेख हे पहाटेच्या सुमारास घरातून बाहेर गेलेले होते, सकाळच्या सुमारास साजिद शेख हा घराच्या पाठीमागे गेला असता त्याला शब्बीर यांनी लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले, दरम्यान नागरिकांनी शब्बीर याला खाली घेत उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी शब्बीर बबनभाई शेख (वय ५५ वर्षे रा. अन्नापूर ता. शिरुर जि. पुणे) याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले, घडलेल्या प्रकाराबाबत वजीर बबनभाई शेख (वय ४६ वर्षे रा. अन्नापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार शिवाजी बनकर हे करत आहे.

## न्हावरेत पतीने पत्नीच्या डोक्यात घातला दातळचा दांडा

**तळेगाव ढमढेरे :** न्हावरे (ता. शिरुर) येथे भावाच्या लग्नाच्या कार्यक्रमासाठी जायचे नाही असे म्हणून पतीने पत्नीच्या डोक्यात दातळाच्या दांड्याने मारहाण केल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे कोंडीबा बापू कारंडे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

न्हावरे (ता. शिरुर) येथील अलका कारंडे या घरात असताना त्यांची भावजय घरी आली आणि तुमच्या भावाच्या लग्नाच्या सवासनीसह अन्य कार्यक्रम आहे तुम्ही चला असे म्हटली असताना अलका यांचे पती कोंडीबा यांनी अलका हिस तू जायचे नाही, त्यांनी मला तुझ्या भावाच्या लग्नात एक तोळा घातले नाही असे म्हणून शिवीगाळ, दमदाटी करत दातळच्या दांड्याने डोक्यात मारहाण करत जखमी केले, याबाबत अलका कोंडीबा कारंडे (वय ३५ वर्षे रा. तांबे वस्ती न्हावरे ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी कोंडीबा बापू कारंडे (रा. तांबे वस्ती न्हावरे ता. शिरुर जि. पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भोते हे करत आहे.

## मंथन परीक्षेत परीनिती कुऱ्हाडेची राज्यात झेप

### राज्यात आठवी व जिल्ह्यात तिसरी

**आळंदी :** मंथन राज्य सामान्य ज्ञान परीक्षा २०२६ मध्ये आळंदीतील महर्षी वाल्मिकी विद्यावर्धिनी शाळेची कु.परीनिती दिनेश कुऱ्हाडे हिने राज्यात आठवा, तर पुणे जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशामुळे आळंदीच्या शैक्षणिक कामगिरीत भर पडली असून, शहरात तिच्या कौतुकाचा वर्षाव होत आहे. परीनितीने सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर ही यशस्वी झेप घेतली. तिच्या या यशामागे वर्ग शिक्षिका विद्या खराडे यांचे मार्गदर्शन लाभले असून, संस्थेच्या संचालिका अक्षता कुलकर्णी यांनीही नियोजनबद्ध तयारी करून देत मोलाची भूमिका बजावली. दरम्यान, या यशाबद्दल आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे व नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. यावेळी परीनितीचे यश हे शहरासाठी अभिमानाची बाब असून, अशा गुणवंत विद्यार्थ्यांमुळे आळंदीची शैक्षणिक ओळख अधिक बळकट होत आहे, असे मत नगराध्यक्ष कुऱ्हाडे यांनी व्यक्त केले.




# महिलांना आरक्षण म्हणजे महात्मा फुले यांना खरी आदरांजली : ना. फडणवीस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर,पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला असून तो महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्त्री-शिक्षण व महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून त्यांना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचे मुळगाव खानवडी (ता. पुरंदर) येथे पुणे जिल्हा परिषदेकडून उभारण्यात आलेल्या 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे' उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, अल्पसंख्याक मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, शिक्षण राज्यमंत्री योगेश कदम आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पैतृक गावात उभारलेली ही अत्याधुनिक शाळा म्हणजे द्विशताब्दी वर्षाची सर्वात योग्य सुरुवात आहे. सीबीएसई पॅटर्नवरील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा असून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यास हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जागतिक स्तरावर झेप घेण्याची क्षमता निर्माण होत असून काही विद्यार्थिनी इस्रो आणि नासासारख्या संस्थांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले.



**महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य विकासाची एक हजार केंद्रे उभारणार :**

पुणे जिल्हा परिषदेकडून 'इंडस्ट्री ४.०' अंतर्गत १०० शाळांमध्ये १०० अद्ययावत प्रयोगशाळा उभारण्यात आल्या असून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली असून भविष्यात अशी एक हजार केंद्रे उभारण्यात येतील असे श्री. फडणवीस यांनी सांगितले. स्त्री शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत त्यांनी भिडे वाड्यात देशातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. समाजातील अनिष्ट प्रथांविरुद्ध लढा देत विधवांचे केशवपन थांबवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढून पहिली शिवजयंती साजरी करण्याचे कार्यही महात्मा फुले यांनीच केले, असे त्यांनी सांगितले. आजचा शिक्षणाचा अधिकार कायदा ही त्याच विचारांची फलश्रुती असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

मंत्री श्री. भुजबळ म्हणाले, महात्मा फुले यांच्या जन्मतिथीबाबत संशोधनातून ११ एप्रिल १८२७ ही तारीख निश्चित झाली आहे. सावित्रीबाई ुले यांनी १८९१ मध्ये प्रकाशित केलेल्या 'महात्मा फुले यांचे अमर जीवन' या ग्रंथात या तारखेचा उल्लेख असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला खासदार सुप्रिया सुळे, आमदार योगेश टिळेकर, राहुल कुल, शंकर मांडेकर, बापूसाहेब पठारे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे , उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, कौशल्य विकास विभागाचे आयुक्त अमित सैनी, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, तसेच जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी मुलींचा रेडिओ-दूरदर्शन केंद्राला प्रेरणादायी दौरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाघोली (पुणे) :** भूमी फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेच्या वाघोली (पुणे) येथील निवासी प्रकल्पातील विद्यार्थिनींनी नुकताच रेडिओ व दूरदर्शन केंद्राचा शैक्षणिक व प्रेरणादायी दौरा केला. या भेटीत मुलींना प्रसारमाध्यमांच्या कार्यपद्धतीची प्रत्यक्ष ओळख झाली.

दौऱ्यादरम्यान रेडिओ प्रसारण, कार्यक्रम निर्मिती, ध्वनिमुद्रण तसेच दूरदर्शनवरील शूटिंग व संपादन प्रक्रिया याबाबत निवेदिका नीता तुपारे यांनी मार्गदर्शन केले. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून माहिती जनसामान्यांपर्यंत कशी पोहोचते, याचा अनुभव विद्यार्थिनींनी घेतला.

यावेळी भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था (ऋढखख), पुणे येथील रेडिओ ऋढखख ९०.४ ऋच् वर विद्यार्थिनींनी तिची सहनशीलता या विषयावर नाटिका सादर केली. या नाटिकेचे लेखन डॉ. कैलास पवार यांनी केले होते. विद्यार्थिनींच्या सादरीकरणाचे उपस्थितांनी कौतुक केले.

माध्यम क्षेत्रातील करिअर संधींबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढून माध्यम क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना प्रकल्प संचालिका अनिता पवार यांनी व्यक्त केली.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते.




## जेजुरीत 'जयाद्री शक्तिपीठ जानाई देवी' यात्रेचा जल्लोष

### दीडशे वर्षांनंतर भव्य मिरवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** जेजुरी नगरीत ग्रामदेवता जयाद्री शक्तिपीठ जानाई देवी यांच्या यात्रेनिमित्त संपूर्ण गाव भक्तिभावाने एकत्र आले. तब्बल दीडशे वर्षांनंतर प्रथमच इतक्या मोठ्या उत्साहात यात्रेचे आयोजन करण्यात आल्याने जेजुरीकरांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.




यात्रेनिमित्त काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत गज नृत्य, ढोल-झांज पथक, सनई-चौघडा, तसेच पारंपरिक वाद्यांच्या गजरात ग्रामप्रदक्षिणा करण्यात आली. देवीची उत्सव मूर्ती रथात विराजमान करून भंडारा व गुलालाची उधळण करत जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. आई साहेबांच्या नावाने चांगभले अशा जयघोषांनी संपूर्ण जेजुरी नगरी दुमदुमून गेली.

महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा यांच्या पवित्र नगरीतील ग्रामदेवता असलेल्या जानाई देवीच्या यात्रेला शुक्रवार, दि. १० पासून सुरुवात झाली असून १० ते १२ या कालावधीत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नुकतेच सुमारे चार कोटी रुपये खर्चून जानाई देवीचे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. जेजुरी ग्रामदेवता सार्वजनिक जानाई देवी मंदिर ट्रस्ट, श्री खंडोबा पालखी सोहळा समिती आणि ग्रामस्थांच्या वतीने यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेदरम्यान पूजा, अभिषेक, धार्मिक विधी, छबिणा, सांस्कृतिक कार्यक्रम, कुस्ती आखाडा तसेच बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळपासून मंदिरात पूजा-अभिषेक सुरू असून भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे.

या धार्मिक विधींचे पौरोहित्य वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी, प्रसाद खाडे, योगेश खाडे, शेखर सेवेकरी, अतुल आगलावे, गणेश आगलावे, चेतन सातभाई आणि अनिरुद्ध आगलावे यांनी केले.

सायंकाळी देवीची उत्सव मूर्ती रथात ठेवून पारंपरिक वाद्यांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीसह आणि भंडाऱ्याच्या उधळणीने शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या यात्रेचे आयोजन जानाई देवी ट्रस्ट, श्री खंडोबा पालखी सोहळा समिती, यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले.

# पाण्याच्या प्रश्नावर अभियंत्यांची एकजूट

### जलसंकटावर उपाययोजनांसाठी पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** - भारतात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या पाणी प्रश्नावर उपाय शोधण्यासाठी अभियंत्यांची एकजूट होत असल्याचे सकारात्मक चित्र समोर आले आहे. पाण्याची उपलब्धता, वापर, वाटप, संवर्धन आणि वाढते प्रदूषण या सर्व बाबींवर व्यापक चर्चा व जनजागृतीची गरज अधोरेखित करण्यात आली.




१९६८ मध्ये स्थापन झालेली इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन ही देशातील अग्रगण्य संस्था असून तिचे देशभरात ३९ केंद्रे कार्यरत आहेत. सुमारे १४ हजारांहून अधिक अभियंते या संस्थेशी जोडलेले आहेत. दरवर्षी जानेवारी महिन्यात तीन दिवसीय परिषदेत पाणी विषयक तांत्रिक, प्रशासकीय आणि सामाजिक पैलूंवर सखोल चर्चा केली जाते.

महाराष्ट्रात मुंबई नंतर पुणे हे या संस्थेचे मोठे केंद्र मानले जाते. पुणे सेंटरच्या चेअरमन तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभागाच्या मुख्य अभियंता वैशाली आवटे यांनी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत धुमाळ यांची भेट घेत जलक्षेत्रातील समस्या व दीर्घकालीन उपाययोजनांवर सविस्तर चर्चा केली.

या बैठकीत आवटे यांनी जलसंपदा विभागातील अभियंत्यांनी मोठ्या प्रमाणावर या संघटनेत सहभागी होण्याचे आवाहन केले. अभियंत्यांचे संघटन मजबूत झाल्यास भविष्यातील जलसंकटावर प्रभावी उपाय शोधणे आणि ते प्रत्यक्षात राबवणे शक्य होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या संस्थेचे जागतिक पातळीवरील अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशन, ग्लोबल वॉटर पार्टनरशिप आणि आंतरराष्ट्रीय जल संघटना यांसारख्या संस्थांशी संबंध असल्याची माहितीही त्यांनी दिली.

संस्थेचे सचिव डॉ. दयानंद पानसे यांनी संस्थेच्या कार्याची व्याप्ती, तांत्रिक माहितीचा लाभ आणि समाजहितासाठी होणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.डॉ. हेमंत धुमाळ यांनी सकारात्मक भूमिका घेत जलसंपदा विभागाकडून जनजागृतीचे उपक्रम राबवले जातील आणि अभियंते सक्रिय सहभाग घेतील,असे आश्वासन दिले.पाणी प्रश्न अधिक जटिल होत असल्याने शासकीय, अशासकीय संस्था, शैक्षणिक क्षेत्र आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्र येणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी राजेंद्र माहुलकर, व्ही. एन. शिंदे, ढोबळे, अवचट, चंदनशिवे, खजिनदार अनिल पाटील तसेच विविध अभियंते व शिरूर मधील पाणी वापर संस्थाचे प्रतिनिधी प्रकाश वायसे आवर्जून उपस्थित होते.बैठकीच्या शेवटी खजिनदार अनिल पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.एकत्रित प्रयत्न आणि जागरूकतेतूनच भविष्यातील जलसंकटावर मात शक्य करणे शक्य होईल असा आशावाद या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

## दिपक कारंडे यांची पोलीस निरीक्षक पदावर झेप

### शिरूरकरांचा अभिमान वाढला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** कर्तव्यदक्षता, शिस्तबद्ध कामकाज आणि प्रभावी जनसंपर्क यामुळे ओळखले जाणारे शिरूर पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक कारंडे यांना राज्य शासनाकडून पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती मिळाली आहे. ९ एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्र पोलीस महासंचालक कार्यालयाने याबाबतचा आदेश जारी केला असून त्यांची नियुक्ती पुणे शहरात करण्यात आली आहे.



महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ मार्फत राज्यभरातील २०१ सहाय्यक पोलीस निरीक्षकांना ही पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामध्ये दिपक करांडे यांचा समावेश असून त्यांच्या या यशामुळे शिरूर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिरूर पोलीस ठाण्यात कार्यरत असताना करांडे यांनी विशेषतः टाकळी हाजी पोलीस दुरक्षेत्रात गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवत अनेक गुन्ह्यांचा छडा लावला. त्यांच्या कामातील काटेकोरपणा, नागरिकांशी असलेला संवाद आणि तत्परतेमुळे ते सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय ठरले. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल शिरूर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध सामाजिक, राजकीय आणि नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. कारंडे यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# आंबा महोत्सवातून शेतकरी-ग्राहक थेट जोडणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्य शासन शेतकरी व ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबवत असून त्याचाच भाग म्हणून मुंबई व नवी दिल्ली येथे आंबा महोत्सव आयोजित करण्याची तयारी सुरू असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. पुणे मार्केटयार्ड येथे आयोजित 'आंबा महोत्सव-२०२६'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत सुरू झालेली शेतकरी ते ग्राहक थेट विक्रीची संकल्पना आज मोठ्या प्रमाणात विस्तारली असून या महोत्सवाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध होत आहे. यंदाचा महोत्सव सुमारे ४० दिवस चालणार असून ६० स्टॉलमध्ये शेतकरी थेट आंबा विक्री करत आहेत. पुढील काळात १५० स्टॉल उभारण्याचा प्रयत्न आहे.

महोत्सवात कोकणातील भौगोलिक मानांकन प्राप्त हापूससह केशर, पायरी आदी विविध आंबा प्रकार उपलब्ध आहेत. जीआय मानांकनामुळे अस्सल आंब्याची ओळख पटून फसवणूक कमी होते. 'क्यूआर कोड' व 'नो युवर फार्मर' उपक्रमांमुळे ग्राहकांना थेट शेतकऱ्यांची माहिती मिळणार आहे.

राज्यात मिलेट, संत्रा, काजू-बेदाणा महोत्सवांसारखे उपक्रम राबवून शेतमालाचे मूल्यवर्धन व ब्रँडिंग करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचा अभ्यास करण्यासाठी विविध राज्यांत अभ्यास दौरे आयोजित केले जाणार आहेत.

मॅग्नेट प्रकल्पांतर्गत फळे, भाजीपाला व फुलांच्या मूल्यसाखळी विकासावर भर देण्यात येत असून राज्यात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती उभारण्याची योजना आहे. यामुळे शेतमालाची जलद पुरवठा साखळी निर्माण होणार आहे.

या महोत्सवाचा उद्देश मध्यस्थ कमी करून शेतकऱ्यांना योग्य दर मिळवून देणे आणि ग्राहकांना दर्जेदार आंबे उपलब्ध करून देणे हा आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंबा खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले.

# कारेगावात रोजगार मेळावा

### ५०० नोंदणी, १५० जणांना नोकरीची संधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) कौशल्य विकास केंद्राच्या वतीने कारेगाव येथे आयोजित भव्य रोजगार मेळावा २०२६ व कौशल्य विकास मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले. शिरूर तालुक्यातील या मेळाव्यास १८ ते ४० वयोगटातील युवक-युवतींचा मोठा प्रतिसाद मिळाला.

मेळाव्यात सुमारे ५०० उमेदवारांनी नोंदणी केली असून सुमारे १५० जणांना नोकरी मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. उमेदवारांनी विविध कंपन्यांच्या स्टॉलला भेट देत थेट मुलाखती दिल्या.

या उपक्रमात फ्लिपकार्ट, बजाज ऑटो, हुंदाई, एलजी, व्हर्लपूल, जाबील, एबी इन्फोटेक, मारुती सुझुकी यांसह एकूण २० नामांकित कंपन्यांचा सहभाग होता. आयटी, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आदी क्षेत्रातील कंपन्यांनी उमेदवारांची निवड प्रक्रिया राबवली.

मेळाव्यादरम्यान आयोजित मार्गदर्शन शिबिरात तज्ज्ञांनी उद्योगांच्या गरजा, आवश्यक कौशल्ये आणि करिअरच्या संधींबाबत माहिती दिली. या उपक्रमामुळे युवकांना रोजगाराच्या संधींसह योग्य दिशादर्शन मिळाले.या मेळाव्याचा उद्देश कौशल्याधारित रोजगार उपलब्ध करून देणे व उद्योजकता वाढवणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले. केंद्राचे संचालक यांनी भविष्यातील रोजगार संधींबाबत माहिती दिली.

एकूणच, या उपक्रमामुळे परिसरातील बेरोजगार युवकांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला आहे.






## मलठण येथे एस आय आर मॅपिंग मोहिमेला गती

### मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** - शिरूर तालुक्यातील मलठण येथील श्री भैरवनाथ मंदिर सभागृहात काल दि. १० ला एस आय आर मॅपिंग व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कामकाजाबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन बैठक पार पडली. या बैठकीत जुन्नर उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे,शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के,आंबेगावचे तहसीलदार सचिन वाघ तसेच तहसील कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून सुपरवायझर,मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करीत सविस्तर सूचना दिल्या. बैठकी दरम्यान एस आय आर मॅपिंग तसेच (प्रोजिनी) प्रणालीद्वारे माहिती नोंदविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संबंधित कामकाजाचा आढावा घेताना आतापर्यंत हे काम अत्यंत सावकाशपणे सुरु असून उर्वरित कामकाज वेळेत पूर्ण करण्यासाठी पुढील दोन दिवस शनिवार व रविवार या काळात एस आय आर मॅपिंग विशेष मोहीम राबवून अधिकाऱ्यांनी याबाबत अचूक माहिती नोंदविण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. या उपक्रमामुळे निवडणूक प्रक्रियेतील माहिती अधिक अचूक व अद्ययावत होण्यास मदत होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी एस आय आर मॅपिंग व योग्य माहिती भरण्यास आगामी दोन दिवसांत जे टाळाटाळ व हलगर्जीपणा करतील त्यांच्यावर गुन्हा दाखल करून निलंबनाचे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना देखील देण्यात आल्याचे मलठण महसूल मंडल अधिकारी विजय फलके यांनी बोलताना सांगितले.

द•ख•ल



## जनतेचा विश्वास सार्थ ठरविणार : अक्षय कर्डिले

**अहिल्यानगर :** राहुरी पाथर्डी नगर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी राहुरी तालुक्यातील विविध गावांचा दौरा करून मतदारांचा मतरूपी आशीर्वाद घेतला. या दौऱ्यात वाघाचा आखाडा, तांदूळवाडी, आरडगाव, मानोरी, वळण, पिंपी वळण, चंडकापूर, केंदळ खुर्द, केंदळ बुद्रुक, शिलेगाव कोंडवड आदी गावांचा समावेश होता.

या दौऱ्यात नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत अक्षय कर्डिले यांना आमदार करण्याचा निर्धार व्यक्त केला. स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या आठवणीने ग्रामस्थ भावूक झाले. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. ग्रामस्थांनी मत व्यक्त करत सांगितले की, ही निवडणूक स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या दुःखद निधनामुळे लागली आहे. राहुरी तालुक्यात 'कामाचा माणूस' म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी विकासाच्या प्रश्नांपासून ते नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होत जनतेशी घट्ट नाते निर्माण केले होते.

ही निवडणूक विकासाची असून आरोप-प्रत्यारोपांची नाही, असेही ग्रामस्थांनी नमूद केले. बारामतीमध्ये जे घडले, ते राहुरीत का नाही घडले? असा सवाल करत स्वर्गीय आमदार कर्डिले यांनी लाईट, पाणी, रस्ते, सभामंडप आदी विकासकामे मार्गी लावल्याचे सांगितले. त्यामुळे राहुरी तालुक्यातील जनता अक्षय कर्डिले यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## नेप्तीत महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री संत सावता महाराज मंदिरात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, सावता माळी तरुण मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची जयंती विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. सावता महाराज मंदिर परिसरात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हातात झाडू घेऊन स्वच्छता अभियान राबवून सावता महाराज मंदिर परिसर स्वच्छ व सुंदर केला. अशी माहिती रामदास फुले यांनी दिली . सावता महाराज मंदिरात महात्मा फुले यांच्या प्रतिमेभोवती आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.ग्रामपंचायत सदस्य संतोष चौरे, माजी सरपंच अंबादास पुंड ,माजी उपसरपंच जालिंदर शिंदे, प्राध्यापक एकनाथ होले सर, समता परिषदेचे अध्यक्ष शाहूराजे होले, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले व अन्य मान्यवरांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राध्यापक एकनाथ होले सर होते.

## पुरस्कारामुळे समाजकार्याची नवी ऊर्जा मिळाली : बेबीताई गायकवाड

**अहिल्यानगर :** सामाजिक कार्यकर्त्या बेबीताई गायकवाड यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रदान करण्यात आलेल्या 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार' मिळाल्याबद्दल श्री विशाल गणपती माळीवाडा देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थानचे सचिव अशोक कानडे म्हणाले की, बेबीताई गायकवाड यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत समाजातील दुर्लक्षित महिलांच्या न्याय व हक्कांसाठी सातत्याने लढा दिला आहे. त्यांनी वाचन संस्कृती वाढविण्यासाठी पुढाकार घेत महिलांमध्ये जनजागृती केली. तसेच एकल महिलांच्या प्रश्नांसाठी शासन दरबारी पाठपुरावा करून त्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधले.

# चर्च जमीन घोटाळ्यात मोठी कारवाई

## सतीश भालेराव अटकेत आरोपींना न्यायालयीन कोठडी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहरालगत घोडेगाव रोड परिसरातील चर्चच्या मालकीच्या कोट्यवधी रुपयांच्या जमिनीच्या गैरव्यवहार प्रकरणात अखेर कारवाई झाली असून, मुख्य आरोपी सतीश डॅनियल भालेराव याला श्रीगोंदा पोलिसांनी अटक केल्यावर सुरवातीला पोलीस कोठडी सुनावली होती मात्र आज त्यांची न्यायालयाने न्यायालयीन कोठडीमध्ये रवानगी केली आहे. या कारवाईने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून, प्रकरणाला आता निर्णायक वळण मिळाले आहे. श्रीगोंदा शहरालगत घोडेगाव रोड परिसरातील चर्चच्या मालकीच्या कोट्यवधी रुपयांच्या जमिनीच्या गैरव्यवहार प्रकरणात मोठ्या प्रमाणात कारवाईचे धडाका चालूच आहे या प्रकरणात यापूर्वीच दीपक नामदेव गायकवाड,वैभव पारधे,संदीपान तुपारे यांना अटक झाली असून, आता सतीश भालेरावच्या अटकेने तपास अधिक गतीमान झाला आहे. पोलिसांनी या रॅकेटचे धागेदोरे अहमदनगर, बारामती आणि कोल्हापूरपर्यंत शोधले आहेत.यामध्ये १.८७ कोटींचा बनावट कागदपत्रांचा डाव उघड झाला आहे या घोटाळ्यात आरोपींनी बनावट लेटरहेड व शिक्क्यांचा वापर करत सुमारे १ कोटी ८७ लाख रुपयांची जमीन हडपण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.'इंडियन केनेडीयन प्रेसबिटेरियन मिशन' आणि 'दि कॉन्फरन्स ऑफ चर्चेस ऑफ क्राईस्ट' या संस्थांची नावे वापरून तहसील कार्यालयाची दिशाभूल करण्यात आली.या घोटाळ्याचे पडसाद महसूल विभागात उमटले असून,तत्कालीन तहसीलदार क्षितिजा वाघमारे व नायब तहसीलदार अमोल बन यांना निलंबित करण्यात आले आहे. इतर संबंधित कर्मचाऱ्यांच्या चौकशीची प्रक्रिया सुरू आहे. याप्रकरणी आता न्यायालयीन प्रक्रिया वेगात सुरू झाली आहे याप्रकरणी अटक करण्यात आलेले सतीश भालेराव यांना पोलीस कोठडी देण्यात आली होती मात्र दि. १० एप्रिल २०२६ रोजी प्रकरण Jt CJJD and JMFC Shrigonda Court येथे हजर करण्यात आले.न्यायालयाने आरोपींना १४ एप्रिल २०२६ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली असून, पुढील सुनावणी १३ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे.खझउ कलम ४०६, ४१७, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२३, १२०(ब) अंतर्गत गुन्हा दाखल असून, या प्रकरणात आणखी काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात आहे त्यामुळेबनावट कागदांवर साम्राज्य उभं राहतं पण न्यायाच्या एका सहीने ते कोसळतं!श्रीगोंद्यातील हा घोटाळा आता फक्त बातमी नाही तर 'सिस्टम'ला हादरा देणारी केस बनत चालली आहे.

## एमआयडीसी प्रशासन, महसूल प्रशासन अजूनही झोपेत

### लाखो रुपयांची माती चोरी : अद्याप तक्रार, पंचनामा नाहीच

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ हद्दीत ६१८ एकरावर एमआयडीसी होणार असून याच जागेतून रात्रीच्या वेळी जेसीबी आणि हायवाच्या मदतीने हजारो ब्रास मातीची चोरी झाली असून अद्यापही एमआयडीसी प्रशासन व महसूल प्रशासन झोपेतच असल्याचे चित्र सध्या बघावयास मिळत आहे. एमआयडीसी प्रशासनाकडून अद्याप कोणतेही तक्रार दाखल करण्यात आली नाही. तर महसूल विभागाकडून साधी पाहणीही करण्यात आली नाही.



लोकसभा निवडणूक वेळी तत्कालीन खासदार सुजय विखे आणि आमदार बबनराव पाचपुते यांच्या प्रयत्नांतून श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ हद्दीतील शेती महामंडळाच्या ६१८ एकर जागेत एमआयडीसीला तत्वतः मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर शेती महामंडळकडून ही जागा औद्योगिक विकास महामंडळाकडे वर्ग करून सातबारा देखील तयार करण्यात आला. परंतु सध्या या एमआयडीसी च्या जागेतून रात्रीच्या वेळी, जेसीबी, हायवा यांच्या मदतीने हजारो ब्रास मातीची चोरी झालेली आहे.

ही जमीन भविष्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत औद्योगिक प्रकल्पांसाठी विकसित होणार आहे . मात्र माती चोरीमुळे जमिनीची नैसर्गिक रचना नष्ट होत आहे.

शासनाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे भविष्यातील उद्योग विकासाला अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे

महसूल विभाग, पोलीस प्रशासन, एमआयडीसी प्रशासन यांना याची माहिती नाही का? की माहिती असूनही दुर्लक्ष केले जात आहे?असा सवाल आता उपस्थित होत आहेत.

## एल.एल.बी परीक्षा फॉर्ममधील तांत्रिक अडचण अखेर दूर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** स्थानिक न्यू लॉ कॉलेजमधील विधी शाखेच्या विद्यार्थ्यांना परीक्षा फॉर्म भरताना येत असलेल्या तांत्रिक अडचणी अखेर विद्यार्थी प्रतिनिधी आणि सल्लागारांच्या विशेष प्रयत्नांमुळे सुटल्या आहेत. यामुळे शेकडो विद्यार्थ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

गेल्या काही दिवसांपासून एलएलबी (LLB) आणि बी.एलएलबी (B.LLB) च्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरताना सर्वर एरर आणि तांत्रिक त्रुटींचा सामना करावा लागत होता. ही समस्या गंभीर होत असल्याचे पाहून विद्यार्थी प्रतिनिधींनी पुढाकार घेतला.

समन्वय आणि पाठपुरावा या तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी महाविद्यालय (अध्यक्ष) महेश शिवाजीराव मचे, हुमैरा अजाज अहमद अन्सारी आणि मुख्य सल्लागार मस्तान कुरेशी तसेच समन्वयक कर्डिले ज्ञानेश्वर यांनी विशेष परिश्रम घेतले. या पथकाने तांत्रिक विभागाशी संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या वतीने अधिकृत ई-मेल केले आणि संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधला. विद्यार्थ्यांना मोठा दिलासा प्रतिनिधींच्या या निरंतर पाठपुराव्यामुळे सिस्टीममधील तांत्रिक दोष दूर करण्यात आले. अडचणी सुटल्याचे समजताच विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. फॉर्म भरण्याची प्रक्रिया आता सुरळीत सुरू असून, वेळेत फॉर्म भरता येणार असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळले आहे.

विद्यार्थ्यांच्या समस्यांसाठी सदैव तत्पर राहून त्यांना 'मोलाचे सहकार्य' करणाऱ्या संघटक विशाखा जाधव अनन्या काळे राजलक्ष्मी पालवे या प्रतिनिधींचे महाविद्यालयीन स्तरावर कौतुक होत आहे.

## कुकडी साकळाई योजना प्रस्तावित असताना अचानक घोडवरून मान्यता कशी?

### * घोड बचाव कृती समितीच्या कार्यकर्त्यांचा सवाल * श्रीगोंदा तालुक्यात साकळाई पाणी प्रश्नावरून शीतयुद्ध!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी साकळाई योजना कार्यान्वित होण्यासाठी गेल्या वीस वर्षापासून संघर्ष सुरू आहे. ही योजना शासन स्तरावरून कुकडीच्या कालव्यातून म्हणजेच विसापूर सिंचन तलावात कुकडीचे पाणी सोडून तेथून साकळाई तलावात सोडून त्या कार्यक्षेत्रातील शेती सिंचनाखाली आणण्यासाठी सत्ताधारी व विरोधक अनेक वर्षापासून शक्तीपणाला लावत आहेत. अखेर ही योजना घोड धरणावरून प्रस्तावित करून मान्यता मिळाल्यामुळे घोड लाभ क्षेत्रातील शेतकरी व शेतकरी नेते आक्रमक बनले आहेत.

वास्तविक पाहता घोड धरणाचे पाणी हे प्रथम शेती व नंतर उद्योगासाठी प्राधान्याने आहे.

तसाच फॉर्मुला सिंचन विभागाने यापूर्वी आखला आहे, मात्र अशी काय? जादू झाली की, कुकडी कालवावरून



ही योजना बारगळली आणि घोड धरणावरून या साखळी योजनेला मान्यता देण्यात आली. ही योजना जर घोड वरून राबवली तर निश्चितपणे घोड लाभ क्षेत्रात आवर्तन चा कालावधी कमी होऊन हक्काच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांना यापुढे तीव्र संघर्षाची वेळ येणार आहे. फार फार तर उन्हाळी हंगामात शेतीला पाणी मिळते की नाही असाही प्रश्न गंभीर होणार आहे असे मत शेतकरी नेते राजेंद्र निळकंठ नागवडे यांच्यासह शेतकरी नेत्यांनी या योजनेला विरोध करत घोड लाभक्षेत्रात शेतकऱ्यांना घोडच्या या पाण्याचे फायदे व तोटे यासाठी प्रबोधन होताना दिसत आहेत. शेतकऱ्यांनी देखील या शेतकरी नेत्यांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा व्यक्त केल्याचे दिसून येत आहे. घोड बचाव कृती समितीच्या म्हणण्यानुसार घोड धरणाचा साकळाई योजनेत समावेश करने म्हणजे घोड धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या झोपेत दगड टाकण्यासारखे आहे. असे म्हटले गेले आहे.

घोड बचाव शेतकरी नेत्यांनी माहिती देताना सांगितले की, साकळाई योजनेला घोड च्या शेतकऱ्यांचा विरोध आहे असे चित्र रंगवले जाते. पण हे धादांत खोटे आहे. ही योजना चुकीच्या पद्धतीने आणि राजकीय सुड बुद्धीने राबवण्याचा घाट घातला आहे. त्यामध्ये घोड्चे अधिकारी देखील धरणातील उपलब्ध व मूर्त पाणीसाठा तसेच आवर्तनला लागणारे टीएमसी पाण्यासंदर्भात दिशाभूल करून शासनाला आकडेवारी देत आहेत. असा आरोप देखील शामराव नागवडे यांनी बोलताना केला आहे.

यावेळी घोड बचाव कृती समितीचे कार्यकर्ते टिळक भोस, राकेश पाचपुते, ॲड. विठ्ठलराव काकडे, स्मितल वाबळे, परेश वाबळे, गोरख उंडे, सुभाष गोरे पाटील, रामचंद्र गवळी आदिंनी आवाहन करत शेतकऱ्यांना या ज्वलंत प्रश्नासंदर्भात जागृत करत आहेत. शासनकर्ते यापुढे या योजनेचा कशा पद्धतीने पाऊल उचलतात याकडे मात्र आता घोड लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## शिक्षकांनी निवृत्तीनंतरही सेवा द्यावी : टेमकर



### मिरीत सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** निवृत्ती ही ठराविक वयानंतर सगळ्यालाच घ्यायची असते व घ्यावी लागते मात्र शिक्षक असे एकमेव गुरु आहेत की ते आयुष्यभर शिकवत असतात त्यामुळे ते सेवानिवृत्त न होता ते फक्त निवृत्त होतात आणि निवृत्त होऊन त्यांनी सेवा देत राहावी असे प्रतिपादन शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांनी केले.मिरी ता. पाथर्डी येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालया मधील भगवान मुखेकर व संजय रायकर या दोन शिक्षकांच्या सेवापुर्तीनिमित्त ते बोलत होते.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे विभागीय मंत्री ज्ञानदेव रावजी पांडुळे तसेच विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे उपस्थित होते.यावेळी मान्यवरांच्या हस्ते सेवापूर्ती होत असलेल्या शिक्षकांचा शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.

यावेळी दिनकर टेमकर म्हणाले की, भगवान मुखेकर यांनी रयत मध्ये चांगले काम केले आहे त्यांच्या पत्नी ही जिल्हा मराठा मध्ये शिक्षिका म्हणून सेवा देते. हे कुटुंब सुशिक्षित असून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करताना त्यांना कधीही फोन केला तरी ते मार्गदर्शन करतात.

कार्यक्रमासाठी मिरी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष कारभारी पाटील गवळी, सर्व सदस्य, शिक्षकवृंद व आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर (घोटण प्राचार्य), नवले सर (जेऊर),धोत्रे सर, पर्य आठरे सर (जेऊर), प्राचार्य व्ही. के. कोकाटे (वाळकी), प्राचार्य श्री म्हस्के सर (करंजी), ज्योतीबा आठरे (तिसगाव), माजी प्राचार्य ससे सर, ढोले सर, दाणे सर, गायकवाड सर, पाडळे सर, लोखंडे सर, सुरेराव आठरे (माजी तालुका कृषी अधिकारी), सुभाष आठरे तसेच श्री बलभीम मुखेकर सर आदींची उपस्थिती होती.

तसेच गावकऱ्यांमध्ये मा. संतोष शिंदे, सुभाष गवळी, बाबासाहेब निमसे, सोमनाथ झाडे, बापूराव झाडे, माजी प्राचार्य नरोडे सर, पंचायत समिती सदस्य राहुल गवळी पा. आदींची उपस्थिती उल्लेखनीय होती.


## जाहीर प्रगटन

समस्ता गावकरी चिलवडी ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री श्रीस/अक्षय राजेंद्र आरडे रा. चिलवडी ता.कर्जत जि.अहिल्यानगर यांनी पंजोबा नामे श्री श्रीम/ धोडीबा तुळशीराम जगताप यांचे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा मृत्यू चिलवडी ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठिकाणी दि. १६/११/१९६५ रोजी झाला असून प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि. १६/१०/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे. वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार कर्जत**


# 'गतिमान' सरकारचा कारभार अन् अंधारात बळीराजा

## चिचोंडी-शिराळ वस्तीवर वीज पुरवठा खंडित झाल्याने शेतकरी आक्रमक



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** राज्यात 'गतिमान सरकार' असल्याचा दावा केला जात असतानाच, दुसरीकडे पाथर्डी तालुक्यातील शिराळ शिवारात गेल्या दहा दिवसांपासून वीज पुरवठा खंडित आहे. वादळी वाऱ्यामुळे विजेचे खांब जमीनदोस्त होऊनही महावितरणकडून दुरुस्तीसाठी दिरंगाई होत असल्याने संतापलेल्या शेतकऱ्यांनी आता तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे.

**वादळाचा तडाखा: विजेचे २६ पोल कोलमडले :** मागील आठवड्यात पाथर्डी तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने मोठी पडझड केली. शिराळ शिवारातील मुळे वस्ती, झाडे वस्ती, पाथरकर वस्ती आणि चेमटे वस्ती परिसरात सुसाट वाऱ्यामुळे महावितरणचे प्रचंड नुकसान झाले. यामध्ये मुख्य वाहिनीचे १० पोल आणि अंतर्गत वाहिनीचे १६ पोल, असे एकूण २६ पोल जमीनदोस्त झाले आहेत. यामुळे संपूर्ण परिसराचा वीज पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे.

**जनावरांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न गंभीर :** ऐन उन्हाळ्याच्या तडाख्यात वीज नसल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. विहिरींना पाणी असूनही केवळ वीज नसल्याने उभी पिके डोळ्यादेखत करपू लागली आहे. वीज नसल्याने चारा कापण्याची यंत्रे आणि पाणी उपसा करणारे पंप बंद आहेत. परिणामी जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. खरीप हंगामातील अतिवृष्टी आणि आता उन्हाळ्यातील हे संकट, यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

**महावितरणची 'तारीख पे तारीख'; शेतकऱ्यांमध्ये संताप :** या गंभीर परिस्थितीबाबत शेतकऱ्यांनी वीज महामंडळाच्या कर्मचाऱ्यांकडे दाद मागितली असता, त्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचा आरोप होत आहे. अशोक लाटे, विकास लाटे, अमोल लाटे, दशरथ मुळे, रवींद्र मुळे, मिठू मुळे, रमेश पाथरकर, किसन मुळे, महेश चेमटे आणि रवी मुळे या शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या संथ कारभाराचा तीव्र निषेध केला आहे.

**आम्ही जगायचे कसे?** पिके जळत आहेत आणि जनावरे तहानेने व्याकुळ आहेत. प्रशासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष काम करावे, अशी भावना संतप्त शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

**प्रशासनाची भूमिका :** अजून आठ दिवसांची प्रतीक्षा? या संदर्भात पाथर्डीचे उपकार्यकारी अधिकारी मयूर जाधव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की,

शिराळ भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यासाठीची टेंडर प्रक्रिया सुरू असून ती पूर्ण होण्यास किमान चार दिवस लागतील. त्यानंतर संबंधित ठेकेदाराला साहित्य (मटेरियल) उपलब्ध करून दिले जाईल. पोल उभे करून वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी किमान आठ दिवसांचा कालावधी लागेल.

**शेतकऱ्यांची मागणी :** प्रशासनाने टेंडर प्रक्रियेचा तांत्रिक अडसर बाजूला सारून आपत्कालीन परिस्थितीत तातडीने वीज पुरवठा सुरळीत करावा, तसेच झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा आगामी काळात आंदोलनाचा पवित्रा घेण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.


## जाहीर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर/४९/२०२६, नेवासा
दिनांक.११/०३/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- **अशोक गोपीनाथ भणगे, रा.भानसहिवरे, ता.नेवासा** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. अशोक गोपीनाथ भणगे, रा.भानसहिवरे यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा. याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

| अ.क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अशोक गोपीनाथ भणगे | भानसहिवरे | २५/११/१९८४ |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासून १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## वळण येथे घरफोडी; रोख रक्कम व दागिने लंपास



राहुरी : राहुरी तालुक्यातील वळण येथे अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना ६ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

कोंडीराम सोपान काचोळे (वय ३९, रा. वळण रोड, ब्राम्हणी) हे कुटुंबासह राहतात. घटनेच्या दिवशी रात्री सुमारे ९ वाजता कुटुंबीय घराला कुलूप लावून शेजारील बाळू मामांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी गेले होते. काही वेळाने परतल्यावर घरातील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत दिसले. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी घराची कडी उघडून आत प्रवेश केला. त्यांनी घरातील दोन लोखंडी कपाटांचे दरवाजे वाकवून त्यामधील सुमारे ३ तोळे सोन्याचे दागिने, ६ भार चांदीच्या पट्ट्या व ६० हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी कोंडीराम काचोळे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा रजि. नं. ३२५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# युवकाचा खून; बोरीच्या ओढ्यात आढळला मृतदेह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शहरातील ढाकणे वस्ती लगत असलेल्या बोरीच्या ओढ्यात एका युवकाचा रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मृत युवकाची ओळख गणेश दिनकर लांडे अशी करण्यात आली आहे. घटनास्थळी आढळलेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित युवकाच्या शरीरावर जखमा असल्याने त्याचा खून करून मृतदेह येथे टाकण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपींच्या शोधासाठी विशेष पथक रवाना करण्यात आले आहे.

दरम्यान, या खून प्रकरणी पोलिसांच्या हाती काही महत्त्वाचे धागेदोरे लागले असून, लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलीस निरीक्षक मुटकुळे यांनी व्यक्त केला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांकडून लवकरात लवकर गुन्हेगारांना अटक करण्याची मागणी होत आहे.



# जेवणाच्या पैशावरून वाद

## हॉटेल मालकासह वेटरला मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** चिकन थाळी बरोबर भाकर मागीतली असता वेटने सांगीतले भाकरीचा वेगळा चार्ज लागेल. त्याचा राग आल्याने आरोपींनी वेटर व हॉटेल मालकाला शिवीगाळ करुन फायटर व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. ही घटना राहुरी फॅक्टरी येथे दि. ६ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

अजित रावसाहेब वने, वय २९ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील गणेगाव येथे राहत असून त्यांचे राहुरी फॅक्टरी परिसरात वाणी मळा येथे हॉटेल वने पाटील नावाचे हॉटेल आहे. तसेच त्यांच्या हॉटेलमध्ये मयुर जगन्नाथ वाघ हे वेटर म्हणुन काम करतात. दि. ६ एप्रिल २०२६ रोजी रात्री १०.१५ वाजेच्या सुमारास वने यांच्या हॉटेलमध्ये आरोपी अक्षय मुसमाडे व जयेश पाटोळे हे दोघे जेवण करण्यासाठी गेले होते. तेव्हा त्यांनी दोन चिकन थाळी घेऊन नंतर एक भाकर मागितली. तेव्हा वेटर मयुर त्यांना म्हणाला कि, भाकरीचा वेगळा चार्ज लागेल.

असे म्हणाल्याचा राग आल्याने त्यांनी वेटरला शिवीगाळ करुन लाथा बुक्क्याने मारहाण केली. आणि तेथुन निघुन गेले. थोड्या वेळाने ते दोघे इतर आरोपींना घेऊन पून्हा हॉटेलमध्ये गेले. तेव्हा आरोपींनी हॉटेल मालक अजित वने व वेटर मयुर वाघ या दोघांना शिवागाळ दमदाटी करुन फायटर व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. नंतर हॉटेलम धील सामानाची तोडफोड करुन नुकसान केले. तसेच वेटर मयुर वाघ याला म्हणाले तु फॅक्टरीवर दिसल्यावर तुला जिवे मारुन टाकीन, अशी जिवे मारण्याची धमकी दिली. अजित रावसाहेब वने यांच्या फिर्यादीवरून आरोपी अक्षय मुसमाडे, रा. देवळाली प्रवरा, जयेश पाटोळे, शंतनु नालकर, दोघे रा. राहुरी फॅक्टरी, ता. राहुरी, सलीम शेख तसेच दोन अनोळखी इसम अशा एकुण ६ जणांवर मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# घोडेगाव जलजीवन मिशन तलाव दुर्घटना प्रकरणी ठेकेदारांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या तलावात बुडून तीन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणी अखेर सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तलावाच्या कामातील निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा ठपका ठेकेदारांवर ठेवण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा रजिस्टर क्रमांक १२२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०५ व ३(५) अंतर्गत हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याप्रकरणी सुभाष वैजनाथ काळे (रा. घोडेगाव) यांच्या फिर्यादीवरून योगेश काशीनाथ हिंगणे (रा. बारामती, जि. पुणे) व के. के. थोरात (रा. संगमनेर) या ठेकेदारांविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

ही दुर्घटना ३१ मार्च २०२६ रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास घडली होती. प्रथमेश काळे, जिवण आव्हाड आणि शोएब शेख (सर्व वय १७) हे तिघे मित्र तलावात बुडाल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, तलावाचे काम अपूर्ण असतानाही आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या नव्हत्या. परिसरात कुंपण, संरक्षण भिंत, सूचना फलक किंवा सुरक्षा रक्षक नव्हता. तलावालगत वर्दळीचा रस्ता असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता.

दरम्यान, अंत्यविधीनंतरच फिर्यादी पोलीस ठाण्यात हजर झाल्याने गुन्हा दाखल होण्यास विलंब झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# महायुती कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा

## एकजुटीचे आवाहन : डॉ. सुजय विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

राहुरी : तालुक्यातील राहुरी खुर्द येथे डिग्रस व बारगाव नांदूर या गणातील भाजपा महायुती कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी बोलताना डॉ. विखे पाटील यांनी ही निवडणूक गट-तट न पाहता सर्वांनी एकत्र येऊन लढवण्याचे आवाहन केले. अक्षय कर्डिले यांना अभूतपूर्व मताधिक्याने निवडून देणे हीच स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले साहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल,असे त्यांनी सांगितले.

राहुरी खुर्द येथे आयोजित या संवाद मेळाव्यास भाजपा महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. विखे पाटील पुढे म्हणाले की, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांनी प्रचंड परिश्रम घेत कर्डिले साहेबांना मोठ्या मताधिक्याने विजयी केले. मात्र त्यांच्या अकाली निधनामुळे ही पोटनिवडणूक अनपेक्षितपणे समोर आली आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ राजकीय नसून भावनिक आणि जबाबदारीची असल्याचे त्यांनी नमूद केले.



राहुरी तालुक्याशी विखे परिवाराचे ऋणानुबंध मतदानापलीकडचे असल्याचे सांगत त्यांनी विविध विकासकामांचा आढावा घेतला. नगर-मनमाड रस्त्यासह अनेक प्रश्न सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेतल्याचे त्यांनी सांगितले. पण या उलट काही लोक आले फोटो आणि व्हिडिओ काढून गेले पण असा मिश्किल टोला त्यांनी विरोधकांना लगावला. पद असो वा नसो, काम करण्याची भूमिका महत्त्वाची असते, असेही ते म्हणाले. यावेळी तनपुरे परिवाराने दाखवलेल्या राजकीय मोठेपणाचे त्यांनी कौतुक केले. संयम, समन्वय आणि परस्पर सन्मान राखून सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन करत, गावपातळीवर प्रचार अधिक प्रभावी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

मेळाव्यात उपस्थित कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेत अक्षय कर्डिले यांच्या विजयासाठी पूर्ण ताकदीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# भाजप स्टार प्रचारकांच्या यादीत अहिल्यानगर जिल्ह्यातील चौघांचा समावेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महाराष्ट्र राज्यातील राहुरी आणि बारामती निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने जाहीर केलेल्या स्टार प्रचारकांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील चार मान्यवरांचा समावेश करण्यात आला आहे.

रिक्त झालेल्या राहुरी आणि बारामती विधानसभेची पोटनिवडणूक २३ एप्रिल रोजी होत आहे . यासाठी भारतीय जनता पक्षाने राज्यातील ४० नेत्यांची स्टार प्रचारक म्हणून नेमणूक झाल्याचे जाहीर केले आहे . यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण , केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह ४० मान्यवरांची यादी जाहीर केली असून अहिल्यानगर जिल्ह्यातील नगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे , माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि विद्यमान आमदार मोनिकाताई राजळे यांचा समावेश आहे .

येत्या २३ एप्रिल रोजी राहुरी विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक होत असून दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले हे भाजपाच्या वतीने निवडणूक रिंगणात उभे ठाकले आहेत. त्यामुळे अक्षय कर्डिलेंसाठी हे स्टार प्रचारक निश्चितच लाभदायक ठरणार आहेत.

## राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे ३० स्टार प्रचारक जाहीर

**राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने ३० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. पक्षाचे प्रमुख नेते या यादीत समाविष्ट असून प्रचाराला वेग येण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादीकडून गोविंद खंडू मोकाटे हे उमेदवार असून ते 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. यापूर्वी याच मतदारसंघात माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी याच चिन्हावर निवडणूक लढवली होती. पक्षाचे जनरल सेक्रेटरी रवींद्र पवार यांनी जाहीर केलेल्या यादीत खासदार शरदचंद्र पवार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, अनिल देशमुख, आमदार रोहित पवार, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, फौजिया खान, राजेश टोपे यांसारख्या दिग्गजांचा समावेश आहे. दरम्यान, भाजपाने यापूर्वीच ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. आगामी दिवसांत दोन्ही पक्षांचे प्रमुख नेते प्रचारसभांमध्ये कितपत सक्रिय राहतात, याकडे मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.**

# अंबेजोगाईत शाळेत धर्मप्रसाराचा आरोप; जिल्ह्यात खळबळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** जिल्ह्यातील अंबेजोगाई येथील एका नामांकित शिक्षण संस्थेच्या शाळेत ख्रिश्चन धर्माचा प्रसार होत असल्याचा गंभीर आरोप समोर आल्याने जिल्हाभरात खळबळ उडाली आहे. शहरातील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय परिसरात असलेल्या या शाळेबाबत ही माहिती पुढे आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांना या शाळेत धर्मप्रसार सुरू असल्याची माहिती मिळताच त्यांनी थेट शाळेत धाव घेतली. कार्यकर्त्यांनी शाळा प्रशासनाकडे याबाबत विचारणा करत तपासणी केली असता, शाळेतील एका कपाटावर एस.आय.एन. चर्च असे नाव आढळून आले. या कपाटात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणारी पुस्तके, तसेच काही संशयास्पद वस्तू आढळल्याचा दावा कार्यकर्त्यांनी केला आहे. यामध्ये जादूटोण्याशी संबंधित साहित्य व नशेची औषधे असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकरणात शाळेतील काही शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा



आरोप कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. तसेच शाळेशी थेट संबंध नसलेली एक व्यक्ती दर रविवारी येथे येऊन ख्रिश्चन धर्माची प्रार्थना घेत असल्याचेही समोर आले आहे. हा प्रकार गेल्या सुमारे १५ वर्षांपासून सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, या घटनेनंतर सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी संबंधित शिक्षण संस्थेच्या कार्यालयात जाऊन संस्थाचालकांना जाब विचारला. या प्रकरणातील जबाबदार व्यक्तींवर पुढील दोन दिवसांत कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच संस्थेशी संबंध नसलेल्या व्यक्तीवर तातडीने गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात आली आहे. जर कारवाई झाली नाही, तर संस्थेसमोर धरणे आंदोलन करण्याचा इशाराही कार्यकर्त्यांनी दिला आहे.

या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालय तसेच गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. दरम्यान, संबंधित शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत तात्काळ चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे. शाळा, महाविद्यालय किंवा कोणतीही शैक्षणिक संस्था ही धर्मप्रसारासाठी वापरण्याची जागा नाही. संस्थेच्या स्थापनेपासून आम्ही हा विचार जपत आलो असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

या प्रकरणामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनानेही याकडे लक्ष केंद्रीत केले आहे.


# सोशल मीडियाच्या अतिरेकी वापरामुळे पालकांमध्ये चिंता

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** ग्रामीण भागातील तरुणाईमध्ये सध्या सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

अर्धवट शिक्षण घेतलेल्या अनेक युवकांना घरातील काम, शेती किंवा जबाबदाऱ्या पार पाडण्याची इच्छा मोबाईल वापरामुळे होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

आई-वडिलांनी काम सांगितल्यास उलट उत्तर देणे, रागावणे आणि दिवसाचा बहुतांश वेळ गल्लीबोळातील चौकात किंवा पारावर बसून मोबाईलवर घालवणे, ही सवय वाढत चालली आहे. विशेषतः सोशल मीडियावर स्वतःचे फोटो टाकत नेत्यांची फुकट प्रसिद्धी करण्यातच काही युवक धन्यता मानत असल्याने पालकवर्गात चिंता व्यक्त केली जात आहे.



अँन्ड्रॉइड मोबाईल आणि इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे ग्रामीण भागातील युवकही डिजिटल झाले आहेत. शिक्षणासाठी किंवा इतर कारणांसाठी पालकांनी मोबाईल उपलब्ध करून दिले असले, तरी त्याचा योग्य वापर होत नसल्याचे वास्तव समोर येत आहे. काही युवकांनी मोबाईलचा योग्य वापर करून उच्च पदे मिळवली असली, तरी अनेकजण सोशल मीडियाच्या आहारी जाऊन स्वतःचे नुकसान करून घेत आहेत. नेत्यांच्या कार्यकर्त्यांप्रमाणे वावरणे, दिवसभर त्यांच्या पोस्टर व फोटो सोशल मीडियावर प्रसारित करणे, यामध्ये तरुणाई गुरफटलेली दिसते. या नादात आई-वडील उन्हातान्हात, शेतात कष्ट करून कुटुंब चालवत आहेत, याची जाणीवही अनेकांना राहिलेली नसल्याचे भयानक वास्तव समोर आले आहे. दिवसातील मौल्यवान वेळ फेसबुक, व्हॉट्सअॅपसारख्या माध्यमांवर खर्च होत असल्याने युवकांच्या प्रगतीवर परिणाम होत आहे. नेत्यांच्या वाढदिवसांचे काही रिल्स, पोस्टर बनवणे यामध्येच वेळ जात असल्याने नेमके काय साध्य होते, असा प्रश्न उपस्थित होत आहे.एकेकाळी महिन्याला मिळणारा एक जीबी इंटरनेट डेटा पुरेसा वाटत होता. मात्र आजच्या काळात दिवसालाही तो अपुरा पडत असल्याने सोशल मीडियाचे व्यसन किती वाढले आहे, हे स्पष्ट होते. समाजाच्या आणि कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तरुणाईने तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून स्वतःच्या प्रगतीकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत अनेक पालकांकडून व्यक्त होत आहे.

**देशाचे आणि समाजाचे भवितव्य घडविण्याची ताकद ज्यांच्या हातात आहे, त्या तरुणांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. सामर्थ्य, ऊर्जा आणि बुद्धिमत्ता असलेल्या या युवकांसमोर आज बेरोजगारी, गुन्हेगारी यांसारख्या समस्या उभ्या आहेत. तंत्रज्ञान आणि इंटरनेटमुळे संधी वाढल्या असल्या, तरी त्याचबरोबर सोशल मीडियाचा अतिरेक तरुणाईला दिशाभूल करत असल्याचे चित्र आहे.**

**नवनाथ अकोलकर**
**माजी मुख्याध्यापक श्रीरामपूर नगरपालिका**

## आग्या मोहोळ मधमाशांचा दाम्पत्यावर हल्ला; प्रसंगावधानाने टळला अनर्थ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील सोनई परिसरातील लांडेवाडी येथे आग्या मोहोळ मधमाशांच्या हल्ल्यात दाम्पत्य जखमी होण्याची धक्कादायक घटना घडली. प्रसंगावधान व वेळेवर मिळालेल्या उपचारांमुळे मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. संतोष उत्तमराव लांडे व त्यांच्या पत्नी अर्चना लांडे हे संध्याकाळी कॅनॉललगत असलेल्या शेत परिसरात फेरफटका मारण्यासाठी गेले होते. यावेळी अचानक २० ते ३० च्या संख्येने आग्या मोहोळ मधमाशांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. या हल्ल्यात डॉ. लांडे यांना १० ते १५ मधमाशांनी दंश केले, तर अर्चना लांडे यांनी प्रसंगावधान राखत पळ काढल्याने त्या बचावल्या.

हल्ल्यानंतर डॉ. लांडे यांनी जीवाच्या आकांताने सुमारे अर्धा किलोमीटर धावत जाऊन जवळील घरात आश्रय घेतला. मात्र काही मधमाशांनी घरातही प्रवेश केल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली. त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने तातडीने सोनई येथील खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले. तेथे उपचारानंतर त्यांची प्रकृती स्थिर झाली.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी कॅनॉल व शेती परिसरात वावरताना सतर्कता बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे.